# माझी अंतरंग...

## भटकंती विशेष

धिरज विजय लोके (दुर्गवीरचा धिरु)



## लेखक परिचय




लेखन / संपादन

**धिरज विजय लोके**

**संपर्क**

९९६९३५९४८६ / ९९३०६७७७४३

१०, साई प्रतिक बिल्डींग, सुभाष क्रॉस रोड, नवापाडा, डोंबीवली (प.)- ४२१ २०२

संपर्क :- ९९६९३५९४८६ / ९९३०६७७७४३

ई-मेल :- dhiraj.v.loke@gmail.com

ब्लॉग :- https://dhiruloke.blogspot.in/

फेसबुक पेज:- https://www.facebook.com/MajheAntrang

फेसबुक प्रोफाईल:- https://www.facebook.com/durgveer.loke

Twitter प्रोफाईल:- https://twitter.com/durgveer_dhiru



मांडणी व सजावट :- समिर शिंदे, कृष्णा सुर्यवंशी

प्रकाशन :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Eleventh Floor, Eternity
Eastern Express Highway
Thane- 400604



- विनामुल्य वितरणासाठी उपलब्ध.
- हे पुस्तक वाचुन झाल्यावर पुढे पाठवु शकता.
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा मजकुर वापरण्यासाठी ई - साहित्यची परवानगी आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षीत आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अशांचे पुर्नमुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होवु शकते.




## अर्पण पत्रिका

२६ फेब्रुवारी २०१२ पूर्वी मी गड-किल्ले, भटकंती, संवर्धन, समाजिक उपक्रम याबाबत “शुन्य” होतो, पण नितीन पाटोळे या अवलियाने फेसबुक वरून केलेल्या आवाहनाला (आव्हानाला) प्रतिसाद देत दुर्गवीर प्रतिष्ठानशी जोडलो गेलो.. ज्या “नितीन पाटोळ” मुळे दुर्गवीरसोबत जोडलो व ज्या “अजित राणें” मुळे दुर्गवीर मध्ये टिकलो आणि ज्या “संतोष हसुरकर” यांच्यामुळे दुर्गवीर मध्ये घडलो, यांसहीत दुर्गवीर मध्ये मला भेटलेल्या प्रत्येक दुर्गवीर बंधुंना आणि छोट्या-मोठ्या भगीणींना “माझे अंतरंग” आज पुस्तक स्वरूपात अर्पण करीत आहे.







# लेखकाचे मनोगत

नमस्कार ! मी धिरज विजय लोके राहणारा डोंबीवली, मुळ गाव:- मिठबांव, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग. १०वी पर्यंतच शिक्षण गावीच झाल. शाळेत इयत्ता ८वी-९वी मध्ये असताना ओंकार (विष्णू)मालंडकर या माझ्या बालमित्रासोबत "पार्टनरशीपमध्ये" एक कवीता केली होती. पण त्या कवीतेत ओंकारचा वाटा ९० टक्के होता आणि माझा वाटा १० टक्के होता. पण त्यानंतरच लिखाण मात्र अभ्यासापुरतच मर्यादीत राहील. २००३ साली डोंबिवलीत रहायला आल्यावर वाचनाची पर्यायाने लिखानाची आवड निर्माण झाली. सप्टेंबर २००३ पासुन लिखाणाला सुरूवात केली पण सुरुवातीला जुन्या डायरीच्या पलिकडे माझ लिखाण कधी गेल नाही. सुरूवातीला Orkut Community नंतर dhiruloke.blogspot.in या ब्लॉग आणि "माझे अंतरंग" या फेसबुक पेज च्या माध्यमातुन लिहीत गेलो. अनेक वाचक निर्माण झाले. लिखानामुळे अनेक जण मला वैयक्तिक जोडले गेले तर काही "दुर्गवीर प्रतिष्ठान" च्या दुर्गसंवर्धन व सामाजिक उपक्रमाशी जोडले गेले. काही नियमीत वाचक आहेत तर, काही सहजच आठवलं म्हणून ब्लॉग व पेज चाळणारे वाचक आहेत. कित्येक वेळा सातत्याने लिखान होत नाही म्हणून Inbox मध्ये मेसेज करुन किंवा फोन करुन "लिहीत रहा, लिखाण थांबवु नका तुमच्या अंतरंगाला बोलत करा" अस आवाहन करणारेही वाचक आहेत. "तुम्ही लिहीलेले लेख मी माझ्या घरच्यांना वाचुन दाखवला सर्वांना आवडला" ही प्रतिक्रिया कोणत्याही पुरस्कारापेक्षा कमी नसते. "सर तुमची कवीता शाळेच्या मॅगझीन मध्ये वाचली खुप छान आह" ही ७-८वी मधल्या मुलीची प्रतिक्रीया ऐकुन मन शहारून येत. पण बऱयाच लोकांची तक्रार होती की, आम्हाला, फेसबुक पेज, ब्लॉग नेहमी वाचता येत नाही. तुमचे अंतरंग आम्हाला समजेल किंवा नियमीत वाचता येईल अशा माध्यमातुन मांडलात तर बरे होईल. तेव्हा पहिला विचार आला ई-बुक चा आणि पहिला पर्याय समोर आला **ई साहित्य प्रतिष्ठान** चा. बरीच वर्ष ई साहित्य प्रतिष्ठानचा नियमीत वाचक होतो पण आज लेखकाच्या भुमीकेत जायच होत. ई साहित्य प्रतिष्ठानच्या सुनिल सामंत सरांशी संपर्क केला. सामंत सरांनी अगदि मोकळेपणाने माझ्या अनेक उलट्या सुलट्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि शंकाचे निरसन केल. मग ठरल माझे अंतरंग - भटकंती विशेष प्रकाशीत करायचं. पुस्तकाची डिजाईन कोण बनविणार ह्याचा विचार करीत होतो तेव्हा समीर शिंदेच नाव आठवलं. समीर बंधुंना फक्त एकदा माझा विचार बोलुन दाखवला. "तुम्ही फक्त सांगा पुस्तक कधी आणि कसं बनवायचं लगेच बनवुन देतो". समीर बंधुंच्या या शब्दांनी धीर आला. नंतर संतोष दादांना विनंती केली की माझ्या पहिल्या पुस्तकाला प्रस्तावना द्यावी त्यांनीही लगेच माझी विनंती मान्य केली. नुकतच १३ मार्च ला माझा वाढदिवस साजरा झाला. कदाचित माझ्या आयुष्यातील हे वर्ष भाग्याचे असावे त्यामुळेच सर्व प्रश्न पटापट सुटत असावेत. लिहायला सुरुवात केल्यापासून तब्बल १४ वर्षांपनंतर आज पहिल पुस्तक प्रकाशीत होतय.

तुम्ही हे पुस्तक नक्की वाचा.आणि तुमच्या प्रतिक्रिया मला फोन, मेसेज, व्हाटस्अप, ई-मेल, पत्र या कोणत्याही माध्यमातुन द्या. अगदि प्रत्यक्ष भेटुन प्रतिक्रिया दिलात तरी चालेल. कारण तुमच्या प्रतिक्रिया मला पुढच पुस्तक लिहायला प्रेरणा देतील. तुमच्या सुचना, प्रतिक्रिया यांचा विचार करुन यापुढे माझ्यात सुधारणा करु शकेन. तुम्हाला लिखाणातील काही आवडल नाही तरीही मला दिलखुलासपणे सांगा. तुमच पुस्तक वाचुन झाल्यावर तुमच्या परिचयाच्या सर्वांना व्हाटसॲप, फेसबुक, ई-मेल, सिडी, पेन ड्राइव्ह, प्रिंट अशा कोणत्याही माध्यमातुन पोहोचवा. प्रत्येकाला पुस्तक कसे वाटले याची प्रतिक्रीया मला व ई साहित्य प्रतिष्ठानला नक्की द्या.

चला तर माझे २०१२ ते २०१७ मधील दुर्गवीर सोबतचे दुर्गदर्शन, दुर्गसंवर्धन व इतर सामाजिक उपक्रमादरम्यानचे काही मजेशीर तर काही हळवे अनुभव जाणुन घ्या. बर ते प्रतिक्रियेच तेवढ विसरु नका !!



# प्रस्तावना

जेव्हा धिरु कडुन पहिल्यांदा मला समजलं की धिरुने दुर्गवीर सोबतच्या अनुभवांवर पुस्तक लिहीलय जे लवकरच प्रकाशीत होतय. तेव्हा तो माझ्यासाठी एक सुखद धक्का होता. या अगोदर धिरुच लिखान वाचलं तेव्हा त्याच्याकडून मला अपेक्षा होती की त्याने एखाद पुस्तक लिहावं. माझी ही इच्छा मी बरयाचदा धिरूला बोलुनही दाखवीली होती. माझी ही इच्छा काही अंशी पुर्ण केल्याबद्दल तुझे आभार. दुर्गवीरच्या गेल्या ९ वर्षात मला जे सहकारी भेटले त्या प्रत्येकामध्ये एक कला होती कुणी चांगले फोटो काढायचं, कुणी चांगल चित्र काढायचं, कुणी चांगल बोलायचं, कुणी चांगल्या कवीता करायचं, कुणी चांगल लिहायचं. प्रत्येकजण आपापल्या कला कौशल्याच्या माध्यमातुन दुर्गवीर च्या कार्याला हातभार लावत असे. तसंच धिरुच्या लिखानाने प्रेरीत होवुन बरेच लोक दुर्गवीर ला जोडले गेले. धिरू सातत्याने त्याच्या लिखानातुन दुर्गवीर चे कार्य समाजासमोर मांडत राहीला. आजही स्वत:च पहिल पुस्तक प्रकाशीत करताना त्याने दुर्गवीर सोबतच्या मोहिमांमधील अनुभव हाच विषय घेतला. यातील बरयाचश्या अनुभवांमध्ये मी धिरू सोबत गडावर होतो. बरेच लेख जुन्या आठवणी डोळ्यासमोर आणुन उभ्या करतात. काही अनुभव वाचताना हे सर्व काल-परवाच घडलंय अस वाटतं. दुर्गवीर सोबतच्या त्याच्या गेल्या ५-६ वर्षातील अनुभव मोजक्या लेखातुन या पुस्तकांतुन मांडलेत. एरव्ही तस मोजक बोलणारां धिरू हे अस ब्लॉग, पुस्तकांच्या माध्यमाने बोलतोय हे उत्तमच आहे. असंच अखंड लिहीत रहा. तुझी लेखणी अशीच कायम तळपत राहुदे. तुझ्या लिखाणातुन असे समाजपयोगी कार्य घडत राहो ही ईश्वर चरणी प्रार्थना करतो व तुझ्या पुढच्या आयुष्याच्या प्रवासाला शुभेच्छा देतो.

जय शिवराय !!

संतोष गुंडू हसुरकर

(संस्थापक / अध्यक्ष :- दुर्गवीर प्रतिष्ठान)



## पुस्तकात काय वाचाल..........

१ ) नि:शब्द प्रवास अफाट पद्मदुर्गाचा
२ ) भिमरुपी महारुद्रा
३ ) आज समजल थरार कशाशी खातात
४ ) काही क्षण हसरे :- मोहिम वढु-तुळापूर
५ ) दर्शन धाकल्या धन्याच :- मोहिम वढु-तुळापूर
६ ) दर्शन शिवजन्मभुमीचे
७ ) सुरगडाशी सुर जेव्हा जुळती
८ ) संताप
९ ) काय रे हे दुर्दैव
१० ) सिंहगड चोरीला गेलाय
११ ) व्रत गडसंवर्धनाचे
१२ ) तपस्वी
१३ ) अफवांची पुंगी - किल्ले मांगी तुंगी
१४ ) भगवान के घर मे देर है अंधेर नही.
१५ ) रानभुलीची राणी
१६ ) कावनईचा असामान्य शिलेदार
१७ ) वाघिणी त्या रणरागीणी
१८ ) चक्रव्युहातील अभिमन्यु
२० ) खरी श्रीमंती
२१ ) अतुट नाते शिवप्रेमींचे



# नि:शब्द प्रवास.... अफाट पद्मदुर्गाचा




छायाचित्र :- विनय जाधव

दुर्गवीरची अजुन एक मोहिम फत्ते....नि:शब्द करून जाणारी....(तसा मी नि:शब्दच असतो म्हणा..) याअगोदर मी पद्मदुर्ग दर्शन केल होत पण यावेळी काहीतरी वेगळ वाटत होत. वाटत होत पुन्हा पुन्हा इथेच येत राहून या अफाट पद्मदुर्गाचे दर्शन घेत राहावे.

दि.२३.०२.२०१३ ला स्वामीनारायण मंदिर, दादर इथुन बसने निघालो. मुंबई, पुणे येथून तब्बल ४४-४५ जण एकत्र येणार होते. यांच्यात अगदि ८-१० वर्षाच्या मुलांपासून ५०-६० वर्षांच्या आईंपर्यंत सर्व हजर राहणार होते. यात तर काही सहकुटुंबच आले होते. आजच्या मोहिमेचे खास वैशिष्ट्य म्हणजे संतोष दादा आणि अजित दादा यांची अनुपस्थिती. या मोहिमेची पूर्ण जाबाबदारी पूर्णपणे नितीन दादा आणि मोनिष दादा यांच्यावर होती. तस प्रत्येक दुर्गवीर स्वत:ची जबाबदारी चोख पाडणार होतो हे नक्की. प्रत्येकाला मोहिमेची आखणी समजावून सांगुन आमचा प्रवास सुरू झाला पद्मदुर्गच्या दिशेने. सकाळी ४ च्या दरम्यान मुरूडला पोचलो तिथे आमच्या राहण्याची व्यवस्था केली होती ६:३० पर्यंत तिथे आराम करून आणि चहा नाष्टा करून पद्मदुर्गच्या दिशेने निघालो.

आता बोटिचा प्रवास सुरू झाला होता उसळत्या दर्याच्या साथीने आम्ही अफाट पद्मदुर्गाच्या दिशेने निघालो. दुरूनच जंजीराचे दर्शन झाले पण आम्हाला आस होती ती जंजीराच्या छाताडावर वसविलेल्या पद्मदुर्गाची. जसजसे पद्मदुर्गाच्या दिशेने जात होतो तशी उत्सुकता वाढत होती. समोर पद्मदुर्ग दिसत होता, खवळलेल्या समुद्रात अगदि ताठ मानेने उभा असलेला पद्मदुर्ग. आमचे सर्व जुने नवे फोटोग्राफर पद्मदुर्गाचे ते अफाट व रौद्र रुप टिपण्यासाठी धडपडत होते. आमची बोट किनारयाला लागली आमचे पाऊल त्या पावनभुमीत पडले. गडदर्शनासाठी पुढे जाण्याअगोदर मोनिश दादांनी पद्मदुर्गच्या बुरूजांचे वैशिष्ट्य सांगितले ते म्हणजे, इतक्या वर्षानंतर लाटांच्या माराने दगड झिजले पण त्यात वापरलेला चुना व इतर पदार्थ अजुनही शाबुत आहेत.

पुढे सर्वांच ओळखसत्र झाल आणि मग पद्मदुर्ग दर्शन सुरू झाले. पुरातत्व खात्याने इथे कामाला सुरूवात केल्याचे तेथे दिसून येत होते. गड फिरताना मन भरून यायचं, अभिमान वाटायचा त्या राजांचा की त्यांनी किती दुरदृष्टी ठेवून भर समुद्रात हा गड बांधला.



अभिमान वाटतो त्या मावळयांचा ज्यांनी हा गड बांधायला आणि सांभाळायला आपल रक्त सांडल. मोनिष दादांचा एक वाक्य खुप काही सांगून जात हा "गड अजुनही सुस्थितीत आहे कारण इथे दगड चुन्या सोबत मावळ्यांच रक्त मिसळले आहे".

पद्मदुर्ग उभारताना सिद्धीला आपल्या अस्तित्वावर घाला घातला जाणार होत हे माहित होत म्हणूनच त्याने गडाच बांधकाम थांबविण्यासाठी जजिंरावरून तोफांचा मारा केला. या गडावर आम्हाला ३०-३५ तोफा दिसल्या यावरुन त्या काळात इथे कितपत युद्धजन्य परिस्थितीला तोंड द्याव लागल असेल याचा अंदाज येतो. या गडाला रोज मावळयांच्या रक्ताचा अभिषेक होत असेल पण तरीही आज आमच्या जनतेला या पद्मदुर्गाच महानपण दिसत नाही. त्या जंजिरा ला भेट दिल्यावर "शिवाजी कभी जंजीरा जीत नही पाया" हे आपण कोडगे होवून ऐकतो, पण एक कोणी उसळुन सांगत नाही की "तुमच्या त्या सिद्धी च्या तोफांना न जुमानता आमच्या मावळ्यांनी हा गड उभारून दाखवीला". संभाजी राजांनी तर दगडी रस्ताच बांधला होता भर समुद्रात पण कल्याणवर आक्रमण झाले म्हणून ही मोहीम अर्धवट सोडावी लागली. अरे सांगा त्या जंजिराच्या सिद्धीला तु तर उंदरासारखा लपून आमच्यावर वार करत होतास आमचे मावळे वाघासारखे लढून तुला शह देत होते. तुमच्यासारखे उंदिर शिकारही लपुन, कुरतडून करतात आणि शिकार खातातही लपूनच पण आमचे वाघ शिकार करतात तीही मोकळ्या रानात आणि खातातही तिथेच. अरे तुझा जंजिरा असेल अजिंक्य रे पण आमचा पद्मदुर्ग आहे अभेद्य रे.....

असलास जरी अजिंक्य तू,
आहे पद्मदुर्ग हा अभेद्य रे,
झुकून उभा राहशील तू,
एक दिस या पद्मदुर्गाच्या समोर रे.........
सावध हो जंजीरया सावध रे....
सावध हो जंजीरया सावध रे....

पुसतील जाब ते मृतात्मे,
ज्यांसी स्वार्थासाठी तु फसविले....
झाले जीवन सार्थ मावळयांचे
ज्यांनी पद्मदुर्गावरी बलिदान दिले.
सावध हो जंजीरया सावध रे....
सावध हो जंजीरया सावध रे....

शान आहे पद्मदुर्ग अमुचा,
फडकातोय यावरी भगवा रे....
आन आम्हास या भगव्याची,
मानाने फडकवू या भगव्यास रे.....
सावध हो जंजीरया सावध रे....
सावध हो जंजीरया सावध रे....



# भिमरुपी महारूद्रा



आजच्या १७.०३.२०१३ च्या मोहिमेत सर्व दुर्गवीरांनी “भिमरूपी” असा रौद्र अवतार दाखवुन दिला. आजच्या मोहिमेची सुरुवात नेहमीप्रमाणेच होती. कोण कॅन्सल कोण नवीन येतय अशा पद्धतीची चर्चा चालू होती. मी, मोनीश दादा जुईनगरला पोचलो तेव्हा तिथे संतोष दादा, ओजस्विनी ताई, सचिन रेडेकर, संदिप काप, राज मेस्त्री, चंद्रशेखर पिलाने, नितीन पाटोळे हे सर्व पोचले होते. पण सर्वात मोठी परिक्षा होती ती आमच्या अनिकेत दादाची (नेहमीप्रमाणे) वाट पाहायची. अचानक मध्ये भयानकपणे इकडे अमित शिंदेचा फोन आला की त्यांनाही मोहिमेवर यायचय. खर तर मानगड ला येणारया लिस्ट मध्ये अमित बंधुंच नाव नव्हत आणि एका गाडीत अगोदरच आाम्ही १० जण झालो होतो त्यात हा ११ वा कुठे बसवायचा हा प्रश्न उभा ठाकला. हा प्रश्न तर देशाची महागाई कशी रोखायची यापेक्षा मोठा होता. आमचे पंतप्रधान संतोष दादाने आम्हा सर्वांशी चर्चा करुन निर्णय घेतला की अमितला बोलवायचे कारण तिकडे जावून जड विरगळी उचलण्यासाठी ताकदवर मावळे पाहिजे होते. अखेरा इकडे अनिकेत दादांचे आगमन झाले तसे आम्ही प्रयाण केल. अमित शिंदे पनवेल ला हजर होते. जेवण करुन पुढच्या प्रवासाला सुरुवात केली. मुंबईतुन अगोदरच निल मयेकर आणि प्रशांत सुर्वे निघाले होते. पुणे वरून सचिन जगताप आणि निळकंठ पोचणार होते. इकडच्या तिकडच्या गप्पा विनोद करीत प्रवास पुर्ण करुन पोचला एकदाचे रामजींच्या घरी. प्रवासामुळे थकवा होता म्हणून मी एकदाचा झोपला बाकीचे जागे होते अस म्हणतांत बाबा. मी तर रात्री झोपलो ते थेट ६:३० ते ७:०० च्या दरम्यान उठलो. चहा नाष्टा करुन मानगडाच्या पायथ्याशी असलेल्या शिवमंदिराजवळ गेलो. तिथे असलेल्या विरगळी योग्य जागी उचलुन ठेवण हे आमच्या या मोहिमेच धेय्य होत. संतोष दांदांनी दिलेल्या सुचनेनुसार कामाला सुरुवात झाली.



काही सभासद नवीन होते त्यांना घेवुन संतोष दादा गडावर जाणार होते. संतोष दादा, रामजी कदम, ओजस्विनी ताई, नील मयेकर, प्रशांत सुर्वे हे गडदर्शनासाठी गेले. गड पाहता पाहता श्रमदान नाही केले तर दुर्गवीर कसले. गडाच्या परिसरातील मारुतीरायाची मुर्ती गडाच्या प्रवेशद्वाराजवळ स्थापन करण्यात आली. जेणेकरुन येणारा प्रत्येकजण प्रथम मारुतीरायाचे दर्शन घेईल मगच गडदर्शन करेल. दुर्गवीरच्या एका तुकडीने भिमरुपी महारुद्राचा गजर केला आणि परतीच्या प्रवासाला सुरुवात केली होती. आम्ही इकडे तोवर सर्व विरगळी काढुन मोकळया करत होतो.

त्या विरगळी काढताना आमचा नेहमीचा मित्र (विंचू भाऊ) भेटिला आला पण त्याच नशीब वाईट म्हणून की काय एक दगड त्याच्यावर पडून त्या अपघातात त्याचे दु:खद मरण झाले. त्याला श्रध्दांजली वाहण्यात जास्त वेळ न दवडता आम्ही विरगळी काढण्याच्या कामात गुंतलो. एक एक विरगळ साधारण ५०-६० किलोची असेल त्यामुळे ३ जण क्वचीतप्रसंगी दोघजण उचलायचो. पण आमचे सचिन रेडेकर बंधु तर एकट्याने ती विरगळ उचलत होते. खरचे ते हॉलिवुडचे सुपर मॅन, ही मॅन आणि कसले कसले मॅन आमच्या सचिन बंधुंसमोर चिंदी मॅन वाटत होते. सचिन दादांना उचलायची वस्तु आणि ती ठेवायची जागा सांगायची तुमच वाक्य पुर्ण होण्याअगोदर ती वस्तु हलेलेली असायची.

इथे दुसर्यांदा मला भिमरुपी महारुद्रा चा प्रत्यय आला. नंतर खरी परिक्षा होती जेव्हा या सर्व विरगळी काळभैरव मंदिराच्या परिसरात व्यवस्थित ठेवायच्या होत्या तेव्हा..... एका वेळी ३-४ विरगळी गाडीत ठेवून जवळच असलेल्या काळभैरव मंदिराच्या परिसरापर्यत नेईपर्यंत पुरता दम निघाला होता. पण शांत बसण आम्हाला काही जमल नसतं. या विरगळी उचलण्यासाठी फक्त ताकदीचीच गरज नव्हती तर निस्वार्थी शिवप्रेमाची गरज होती. या विरगळी उचलताना कुणाच बोट दगडाखाली सापडतय तर कुणाला खरचटतय तर कुणाच्या पायाला लागतय पण या होणारया जखमांकडे कुणाच लक्षच नव्हत. या त्रासापेक्षा शेकडो वर्ष खितपत पडलेल्या विरगळी योग्य, सुरक्षीत जागी ठेवल्या जातात याचे समाधान होते. परकियांच्या आक्रमणाने आणि स्वकियांच्या उदासीनतेमुळे या विरगळी आज शेवटच्या घटका मोजतायत.. आज या ऐतिहासिक ठेव्याच्या संवर्धनाची गरत्ज आहे. आज दुर्गवीरांनी या विरगळीची होणारी फरफट काही अंशी थांबवीली पण अजुन बरंच काम बाकी आहे. या विरगळींसाठी एक दालन उभारणं गरजेच आहे, जेणेकरुन पुढच्या पिढिला समजेल की आपली संस्कृती काय आहे.



आज कितीतरी तरुण तरुणींना बॉलीवूड, हॉलीवूड चे काल्पनिक सुपरहिरो माहीत असतील पण, खरया आयुष्यात सुपुरहिरोपेक्षा पराक्रम गाजविणारया या विरांची निशाणी असलेले या “विरगळी” मात्र फार कमी जणांना माहीत असतील. हाच महापराक्रमी इतिहास व त्याच्या खुणा जपण्याचा प्रयत्न आम्ही दुर्गवीर करतोय आणि यातुन आम्हाला काय मिळत तर इतिहास जपल्याचे समाधान जे समाधान इतर कोणत्याही फायद्यापेक्षा कैक पटिने जास्त आहे.
हा दुर्लक्षीत ऐतिहासिक ठेवा मुकपणे आपली व्यथा मांडतोय ती अशी.....

होय...... मी तोच साक्षिदार आहे ज्याने लढाया लढताना पाहिलय.......
पण दुर्दैवान स्वत:च लढतोय स्वत:च्या अस्तित्वासाठी......
ओळख पटतेय का काही ??
मी तोच ज्याची अनेक रुपे आहेत.....
कधी मी वीरांच्या पराक्रमाची गाथा सांगत “विरगळी” रूपात असतो,
कधी पतिप्रेमाची साक्ष देत “सतिशिळा”च्या रूपात असतो,
तर कधी वचनाचा मान राखत “धेनुगळ” च्या रूपात........
पण माझी अजरामर रूपे आज मरणासक्त अवस्थेत आहेत.....
जे वीर स्वत:च्या जीवाची पर्वा न करता या मातीसाठी लढले त्याचा पराक्रम आज मातीमोल झालाय....
माझ्या शेवटाला सुरूवात केव्हाच झालीय, कुणीतरी या सुरूवातीचा शेवट करा....
नाहीतर माझी ही विविध रूपे एक आख्यायीका बनून राहतील.....
माझी आर्त हाक तुमच्या कानात गुंजण्यापेक्षा, तुमच्या काळजाचा ठाव घेईल अशी आशा करतो
हा पाषाणहृदयीपणा सोडून या पाषाणाच्या हाकेला ओ द्याल हीच प्रार्थना करतो.....



## आज समजल थरार कशाशी खातात...



दुर्गवीर सोबत अनेक गडदर्शन मोहिमा केल्या खुप डोंगर चढलो या सह्याद्रीच्या कुशीत अनेकवेळा झेपावलो, पण आजची झेप जरा जास्तच थरारक होती. मानगडपासुन काही अंतरावर एक डोंगर आहे तिथुन पुढे जावळीचे खोरे आहे. तिथुनच जवळ असलेल्या एका डोंगरावर एक पडकी दगडी सिंहासनसदृष्य वास्तु व बालेकिल्ला असल्याचे आम्हाला समजले होते. हे सर्व पहावे म्हणून आम्ही सर्व निघालो. रामजी कदम, संतोष दादा, सचिन जगताप, अमित शिंदे, संदिप काप, अजित दादा, नितीन पाटोळे, महेश सावंत असे सर्व आम्ही सकाळी ८:३० च्या दरम्यान चढाईला सुरुवात केली. काही स्थानिक आमच्या मदतीला येणार होते पण काही कारणास्तव ते येवू शकले नाहीत म्हणून आम्हीच जायचे ठरवले. त्यानंतर आमच्या सरसेनापतींनी आदेश दिले “सरळ डोंगर दिसतो तस चालत जायच.” उभा डोंगर चढायचा होता तोही कोणत्याही दोरी आणि काय काय वस्तु वापरतात त्याशिवाय..... थोडक्यात काय रॉक क्लाइंबींग तेही कोणत्याही साधनाशिवाय. माझी तब्येत काही ठिक नव्हती त्यामुळे मी शेवटी राहणार होतो हे नक्की होत. माझ्या पायात ऑफिस शुज आणि ट्राउजर असल्यावर माझा पहिला नंबर येण्याची तिळमात्रही शक्यता नव्हती. मी अक्षरश: सरपटतच वर चढत होतो. तेव्हा मला उगाचच स्पायडर मॅन झाल्यासारख वाटत होत. दगड पकडत, झाडांचा बुंधा पकडत तो उभा डोंगर आम्ही चढत होतो. इतिहासात मावळे कसे कड्या कपारयातुन चढत असतील या भावनेने अंगावर शहारे येत होते. उभा डोंगर त्यात पाय घसरविणारे गवत यावर मात करीत आम्ही डोंगराच्या टोकाशी पोहोचलो. डोंगराच्या टोकाशी काही टाकी व काही वाड्यांचे अवशेष अस्तित्वात आहेत.



अजुन थोड वर गेल्यावर तिथुन रायगडाच दर्शन झाल. त्या डोंगरावर एकच घर होत. लाईट वगैरे तर अशा सुखसोयींचा दुरपर्यंत संबंध नव्हता त्यांच्याशी. काही वर्ष अगोदर इथे एक वाडी होती पण आता बाकीची लोक खाली रहायला गेली फक्त एकच घर तिथे राहिलय. एकच उरलेल्या त्या घरात इतिहास वगैरे जाणुन घ्यायचा प्रयत्न केला पण फारस काही हाती लागलं नाही. पण गरीबांघरची मायेची चटणी - भाकर मात्र खायला मिळाली. आता परत खाली उतरायच होत. पण उतरताना मळलेल्या वाटेने उतरायचं ठरलं. मग आम्ही वळणा-वळणाचा रस्ता पार करत खाली उतरलो. शाळेत असताना विज्ञानात एक प्रश्न होता, घाटातील रस्ते वळणावळणाचे का असतात ??? त्याच उत्तर आज प्रात्यक्षीकासहीत मिळालं. घाटातील रस्ते वळणावळणाचे असतात कारण सकळेच दुर्गवीरचे मावळे नसतात ना !! कुठल्याही साधनाशिवाय गुरुत्वकर्षनाच्या विरोधात जावुन डोंगर चढायला. आम्ही खाली उतरलो आणि सरळ उभ्या असलेल्या डोंगराकडे बघितल तेव्हा आम्हाला समजल आम्ही काय केलयं. खुप मेहनत करुन न्युटन ने गुरूत्वकर्षनाचा शोध लावला आणि आम्ही दुर्गवीरांनी त्यालाच बगल देवून डोंगर पार केला.



## काही क्षण हसरे :- मोहिम वढु-तुळापूर



आमची वढु-तुळापूर मोहिम सर्वच अर्थाने जबरदस्त झाली. काही हसरे तर काही मनाला चटका लावून जाणारे आणि काही धाकल्या धन्याच्या आठवणीने मन हेलावून टाकणारे क्षण अनुभवले. हे सर्व अनुभव एका लेखात लिहीने मला योग्य वाटले नाही म्हणून मी याचे दोन लेख लिहिले आहेत त्यातील पहिला लेख काही क्षण हसरे :- मोहिम वढु-तुळापूर आणि दुसरा लेख दर्शन धाकल्या धन्याच :- मोहिम वढु-तुळापूर यापैकी हा पहिला लेख....

शिवजयंतीचा उत्सव उत्साहात पार पडला लगेचच आम्ही ७ जण वढु-तुळापूर ला जाणार होतो. ठरल्यानुसार मी, राज मेस्त्रि, नितीन पाटोळे, नील मयेकर, सचिन रेडेकर, सुरज कोकितकर, मोनिष चौबळ असे ७ जण शिवजयंती आटोपून निघालो. मी आणि राज दादा त्याच्या घरी जेवून निघालो. नितीन, सुरज, नील, सचिन अगोदरच दादर स्टेशन ला पोचले होते. रात्री साधारण ११:४५ ची ट्रेन होती चेन्नई एक्सप्रेस. ट्रेन मध्ये गर्दि नसणार आपण झोपून जाणार अस आमच्यातलच कोणीतरी आम्हाला बोललं. ट्रेन आली नेमका जनरल डब्बा मागे आला पुन्हा आमची धावपळ डब्बा पकडायला. शेवटी एकदाचा डबा पकडला आतमध्ये बघीतल तेव्हा आम्हा सर्वांचा चांगलाच भ्रमनिरास झाला. आतली भिषण परिस्थिती पाहता आमच्यापैकी एकालाही बसायला मिळायची चिंटुकलीही आशा नव्हती. जो कोणी म्हणाला गाडी खाली असेल, बसायला मिळेल त्याच्या नावाने खडे फोडत आम्ही जागा मिळेल तिथे पसरलो. सचिन आणि नितीन दादा मागे होते. मी, सुरज, निल,राज दादा सर्व पुढे गेलो पण मला तर माझे दोन पैकी एक चर्तुथांश पाय ठेवायलाच जागा मिळाली होती त्यामुळे पुढे जायच की मागे या धर्म संकटात मी सापडलो होतो. मग गप्पपणे गरीब चेहरा करुन उभा राहीलो.. अपेक्षा होती कोणीतरी थोडीतरी जागा देईल बसायला. पण माझी ही ॲक्टिंग फुल फ्लॉप होतेय अस वाटु लागल होत मला, तेवढयात सिट वरचा एक माणुस उठला आणि सिटखाली जावून झोपला. आता तिथे जागा झाली होती पण मी ती जागा हिसकावून न घेता माझी गरीबपणाची ॲक्टिंग चालु ठेवली. समोर जागा दिसत होती पण बसू शकत नव्हतो त्या एवढ्याश्या जागेसाठी त्या बायकांशी कोण भांडेल ?? हा मध्यमवर्गीय विचार करून मी तसाच उभा राहिलो. पण दुसर कोणी आत जावून ती जागा पटकावणार नाही याची खबरदारी घेतली. थोडा वेळ त्या जागेकडे बघत राहीलो. माझी ती अवस्था पाहून एका माणसाला माझी दया आली त्याने मला त्या जागेवर बसायला सांगितल. आता मला माझ्र संख्याबळ वाढल्याची जाणीव झाल्याने धीर आला. आता मला जर कोणी त्या जागेवर बसण्यापासून अडवल असत तर मी त्याचा शिरच्छेदच केला असता (नजरेने बर का !!).



मी सिट वर बसायला जाणार इतक्यात तिथल्या एका बाईने माझ्या बसण्यावर आक्षेप घेतला मी असा काही "अँग्री यंग मॅन" चा लुक दिला की, तिचा विरोध मावळला. माझी जागा तरा फिक्स झाली होती. आता मला जागा मिळालेली पाहुन इतर दुर्गवीरांना प्रश्न पडला होता "च्यामारी ह्याला जागा मिळालीच कशी ???" पुर्वपुण्याई बाकी काय ???? त्यांच्या चेहरयावरचे भाव पाहून मला थ्री इडियट चित्रपटाचा डायलॉग आठवला...... दोस्त अगर फेल हो जाये तो दु:ख होता है पर दोस्त अगर फर्स्ट आ जाये तो ज्यादा दु:ख होता है...... तिकडे नितीन दादांनी बोलबच्चन देवून जागा पटकावली आणि सचिन दादांनी मिळालेल्या जागेत बसून घेतल... सचिन दादांना कोण उठवणार म्हणा, त्यांना उठवणारा या जगातुन उठायचा..... इकडे राज, निल, सुरज बंधू आळीपाळीने एक जागा शेअर करत होते. नंतर कदाचित माझ्या पुण्याचा घडा भरून वाहत होता की काय, म्हणून मला थेट विंडो सिट ची ऑफर आली अर्थात मी ती ऑफर स्विकारली. कल्याणला पोचल्यावर मी मोनीश दादांना विंडो सिट वरून आवाज दिला (विंडो सिट बरं.... विंडो सिट वर बसायच सुख एक डोंबिवलीकरच समजू शकतो).

मी बसलो ती विंडो सिट खर तर सिंगल सिट होती तरी तिथे आम्ही अगोदरच दोघ बसलो होतो पण तरीही मी सुरज दादांना तिथे ॲडजस्ट केल होत आणि त्या सिंगल सिट वर आम्ही तिघ बसलो. आमच्या आजुला बसलेला भैय्या (जो मराठी नाही तो भैयाच ना) सुरज बंधुंच्या नावाने खडे फोडत होता पण आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि आमचे अतिक्रमण सुरूच ठेवले. शेवटी आमच्या अतिक्रमणाला कंटाळून तो भैया का कोणी व्यक्ती चक्क ती सिट वरची जागा सोडून खाली बसला. (बघा आश्च्चर्याची गोष्ट आहे ना मराठी माणसांच्या अतिक्रमणाला कंटाळून भैय्याने जागा सोड्या). नंतर मग आम्ही गाणी ऐकत ऐकत मध्येच डोळे मिटुन आत्मचिंतन करत होतो (लोकांना वाटत मी झोपतो). नंतर राज दादा पण ग्राउंड फ्लोअर वरून फर्स्ट फ्लोअर जावून बसले व माझ्यासारख चिंतन करू लागले. शेवटी ट्रेन एकदाची पोचली पुणे स्टेशन ला. खर तर आम्हाला दुसरीकडे उतरायच होत पण ट्रेन ड्रायवर ला कुठे माहीत होत आम्ही काहीही प्लानिंग न करता आलेलो. रात्री ३:३० ला पुणे स्टेशन ला पोचला आता पुढे काय ?? हा प्रश्न आ.... वासुन आमच्यासमोर उभा राहिला. हाच भलामोठा आ..... घेवून आम्ही पुणे स्टेशन बाहेर पडलो. बाहेर पडताच पहिले दर्शन झाले ते पुणेरी पाट्यांचे..... पहिली पाटी दुध झेरॉक्स आणि खाली बाण दाखविला होता. दुसरा बोर्ड होता महाराष्ट्र शासन दुध सरीता झेरॉक्स, दुध दर :- ....... रु. लिटर.................. या दोन पाट्यांचा अर्थ काय असेल याचा विचार करत आम्ही पुढे गेलो. नक्की दुधाची झेराक्स काढुन मिळेल की झेराक्स केलेल दुध लिटर मध्ये मिळेल की अजून काही...पुढे जावून आम्ही चहा घेतला आणि बुडवायला क्रिम रोल घेतला. चहा पिवून झाल्यावर समजल की एका कटिंगची किंमत होती रू.१०/- फक्त बर त्यात "शुगर" होती की नाही याबाबत कोणीच "शुअर" नव्हत.



ह्या “अर्ध्या स्टार” चहाचे “फाईव स्टार” रेट पाहून आमचे शक्तीमान सचिन रेडेकर बंधु भडकले. “तु मुंबई मे आ तेरे को फ्री मे चाय पिलाता हु” असे धमकीवजा निमंत्रण त्या चहा वाल्याला दिले. अर्थातच त्याने ते निमंत्रण स्विकारल नाही एकतर सचिन बंधुंची शरीरयष्टी आणि दुसरी ट्रेन ची तिकीट दोन्ही गोष्टि परवाडणारया नव्हत्या. तिथून सचिन दादांना आम्ही लवकरात लवकर हलवलं नाहीतर सचिन दादांनी त्या चहावाल्याला हलवलं असत एवढ नक्की.....

आम्ही थोड पुढे गेलो चौकशी केली तेव्हा समजल ६ वाजेपर्यंत काही गाडी नाही. चालत जायच, बसायच की झोपायच.... मी आणि राज दादा झोपायच या मतावर ठाम होतो. नंतर नितीन दादा रिक्षावाल्यांशी हितगुज करत होते. कंटाळुन रस्त्याच्या कडेला उभे राहिलो पण नितीन दादा हार मानत नव्हते त्यांनी रस्त्याच्या दुसरया बाजुला जावून एका “दाढिधारी” रिक्षावाल्याला बोलबच्चन दिली. चांगली १५-२० मिनीट “उच्चस्तरीय चर्चा” केल्यावर नितीन दादांनी आम्हाला रस्त्याच्या दुसरया बाजुला बोलवुन घेतल. आम्ही इच्छा नसताना डिव्हाइडर ओलांडुन रस्त्याच्या पलिकडे गेलो तिकडे गेलो तर काय फुस्स...... हा दिक्षावाला तर ३०-४० रुपये जास्तच मागत होता. तिथुन झालेला भ्रमनिरास सहन करीत पुन्हा बस स्टॉप च्या दिशेने आलो. तिथे अजून एक “दाढिधारी” माणूस दिसला त्याने सांगीतले की, पुढिल ४ मिनीटात इथे बस येईल पण पुढची ४० मिनीट तिथे बस काही आलीच नााही आणि तेव्हाच माझा या “दाढिधारी” माणसांवरचा उरला सुरला विश्वास उडाला होता. बरयाच वेळानंतर तिथे हडपसर ला जाणारी बस आली ट्रेन च्या मागे धावायची सवय असल्याने धावत बस पकडली आणि चक्क जागा सुद्धा मिळाली. मस्त गुलाबी थंडी पडली होती पण अंगात स्वेटर नसल्याने नंतर ही गुलाबी थंडी लाल, निळी, हिरवी, पिवळी वाटु लागली होती. गुलाबी थंडीत झोपी गेलो आणि जाग आली तेव्हा हडपसरला पोचलो होतो. शिस्तीत उतरुन तिथे थांबायच होत पण नितीन दादांच्या संकल्पनेतुन आम्ही सासवड ला जायच ठरल. मला काय मला न्याल त्या गाडीत बसून जायच होत. आमच नशीब इतक चांगल ??(वाईट) होत की, आम्हाला लगेच सासवड ला जाणारी एस. टी. मिळाली. आम्ही ७ जण इतर २ जण आणि ड्रायवर, कंडक्टर असे १०-११ जण आम्ही दाटीवाटीने एस. टी. त बसलो. तिकीट काढली पण जशी एस. टी. सुरू झाली तस आम्हाला जाणीव झाली आम्ही साध्या सुध्या एस. टी. मध्ये नाही तर बुलेट एस. टी मध्ये बसला होतो. अस वाटत होत जावून एकदा तिकीट चेक कराव नेमक एस. टी च आहे की, विमानाच.....अस वाटत होत ही बुलेट एस. टी. कधी थांबणारच नाही. दे दणादण अक्षरश: एस. टी. उडवतच एस. टी चालवत होता ड्रायवर .स्पीड ब्रेकर, खड्डे या खुळचट कल्पना असतात, अंधश्रद्धा असतात या अविर्भावात तो एस. टी चालवत (उडवत) होता. मग फार विचार न करता गुलाबी थंडीतुन आणि उडणारया एस. टी. तुन एकदाचे सासवड ला पोचलो.



उतरल्यावर ड्रायव्हरचा चेहरा पहायची इच्छा झाली नक्की महेश दादा नाही ना. पण महेश दादा नव्हता, तेव्हा मला विश्वास पटला महेश दादापेक्षा भयंकर गाडी कोणीतरी चालवत. बर सासवड ला उतरल्यावर समजल आपल्याला सासवड ला यायचच नव्हत हडपसर वरुन थेट वाघोली बस पकडायची होती. तेव्हा आम्हाला जाणीव झाली हडपसर वरून लगेच एस. टी. मिळण हा आमच्या वाईट नशीबाचा एक भाग होता. आता वेळ आहेच तर वेळेचा सदुपयोग करत आम्ही पुणे स्टेशन ला खालेल्या क्रीम रोल चा लोकार्पण सोहळा सासवड ला इंट्री फी रू.२/- देवून आयोजीत केला होता. नंतर हा सोहळा आटोपुन पुन्हा बस बस च खेळ खेळायला सुरूवात केली. हा खेळ माझ्या इतका अंगाशी आला होता की मला बस मध्ये मिळेल तितका वेळ डोळे मिटुन चिंतन कराव लागत होत. तस नसत केल तर नवकीच माझ वॅकी वॅकी झाल असतं.

एव्हाना उजाडल होत सचिन जगताप आणि अजय आठवल (सह्याद्रीचा भक्त) यांच्यासोबत फोना-फोनी सुरू झाली होती. आता बस-बस चा खेळ संपला होता. खरी मजा तर पुढे होती. अजय दादांनी आमच्यासाठी अल्टो गाडी पाठवली होती. आता मात्र आम्हाला "ग्रॅंड सर्कस" करावी लागणार होती. ड्रायवर सहीत ८ माणस अल्टो मध्ये ही अशक्यप्राय गोष्ट शक्य करायची होती. पुढे ड्रायवरसहीत सुरज आणि निल दादा बसले. मागे नितीन दादा, मोनिष दादा, सचिन दादा ही मोठ मोठी माणस बसली. एव्हाना गाडीची सहनशिलता संपली होती पण आमची सहनशिलता बाकी होती. या तिघांवर राज दादांना फोल्ड करून ठेवल. आता प्रश्न राहीला होता माझा. माझ अर्ध शरीर कसंबसं मी आत घुसवल बर उरलेल शरीर कुठे ॲडजस्ट करायच. समजा केल कुठेतरी ॲडजस्ट तर मग दरवाजा लावायला रस्त्यावरच्या लोकांना हाक मारायला लागणार होती एवढ नक्की. आम्ही दुसरया बाजुने बाहेर जातो की काय अस एक क्षण वाटल होत. पण नितीन दादांनी दुसरी बाजू लावुन धरल्याने प्रश्न माझाच उरला होता. मग थोडी सिट ॲडजस्ट करून मी माझ मध्यम बांध्याच शरीर कसंबसं आत घेतल आणि अखेर दरवाजा लागता. त्यावेळी आम्हा सर्वांना कळुन चुकलं होत कोंबण किंवा कोंबुन भरणं म्हणजे काय ??

अल्टो थेट गेली अजय दादाच्या घरी. घराबाहेरच्या मंदिरात दर्शन घेवुन आम्ही दादांच्या घरी गेलो. तिथे आमच उत्साहात स्वागत झालं पहिला चहा घेतला, मग फ्रेश झालो मग पुन्हा नाष्टा, मग कोल्ड्रींक असा आमचा एकूण छोटेखानी आहार झाला. (थोडा क्रम चुकला पण चालायचं.). नंतर आम्ही तुळापूरच्या दिशेने गेलो पण आता बाईकची व्यवस्था झाल्याने गाडीत कोंबाकोंबी न करता "हम दो हमारे दो" असा छोटा आणि सुखी परीवार झाला आणि बाईकवर १ + १ = २ अस साध गणित मांडल. वढु तुळापूर ला मनाला चटका देणारे अनुभव आले ते पुढच्या भागात मांडलेत. वढु तुळापूर दर्शन झाल्यावर पुन्हा अजय दादांच्या घरी आलो तिथे वहीनींच्या हातच भात, डाळ, भाजी, पापड, श्रीखंड, चपाती हा पंचपक्वान्नाचा बेत हाणला. आम्ही ज्या राक्षसी पद्धतीने जेवत होतो त्यावरून वहीनींना सांगाव लागल नाही की जेवण कसं झालय. ज्या पद्धतीने सगळे घपाघप जेवत होते त्यावरून अंदाज येतच होता जेवण कस होत. बर या राक्षसी पद्धतीने जेवण्याचे समर्थन करण्यासाठी "मोहिमेत पाणी जास्त पितो म्हणून जेवण जास्त जात नाही" असा युक्तीवाद करण्यात आला. यावेळी अजय दादांचे त्यांच्या मुलींवर केलेले संस्कार जाणवले. जेवण वाढायच्या कामात मदत, जाताना पाया पडत अगदि सर्व संस्कार जाणवत होते. मग थोडीशी वामकुक्षी घेवुन पुन्हा प्रवास सुरू केला मुंबईच्या दिशेने. बसायला जागा मिळाल्याने छान झोपा काढत मुंबईत पोचला या संपूर्ण प्रवसात आम्ही अनुभवले काही क्षण हसरे कायम लक्षात राहण्यासारखे.



## दर्शन धाकल्या धन्याच - मोहीम वढु तुळापूर

द



शिवजयंतीचा उत्सव उत्साहात पार पडला. आता तयारी सुरू झाली वढू-तुळापूर मोहिमेची. तस माझ या मोहिमेत जाण कॅन्सल झाल होत कारण रविवारी एक महत्वाच काम होत. पण माझ मन मला स्वस्त बसु देत नव्हतं. मला स्वत:चाचा राग येत होता. किती दिवसांपूर्वीची इच्छा होती या दोन पवित्र स्थळांना भेट द्यायची. मन सारख खात होत. मी अक्षरश: रडकुंडीला आलो होतो. अधून मधून राज दादा मला सांगत होता “धिरू तु येतोयस....मला बाकी काहीही सांगु नकोस.... तु येतोयस”.... शेवटी ठरवलं जायच मोहिमेला बाकी सर्व गेल उडत. आम्ही कसे निघालो काय हसरे क्षण तिथे अनुभवले ते मी या अगोदरच्या लेखात “काही क्षण हसरे मोहीम वढु तुळापूर” या लेखात मांडलेत आता वढू-तुळापूर या दोन ठिकाणी मन हेलावून टाकणारे अनुभव आले ते या लेखात मांडतोय.

आम्ही अजय दादांच्या घरून थेट तुळापूर ला पोहोचलो. आम्हाला कल्पना होती की आम्ही तिथे अंगावर शहारे येणारे अनुभव घेणार आहोत. आम्ही तुळापुरला गाडीतुन उतरलो. समोर भव्य प्रवेशद्वार आतमध्ये काही पर्यटक डबे खात बसलेत. काही दुकान मांडली आहेत, कुणी झोपलय तर कुणी अजुन काही करतय. छे..... ते सर्व वातावरण पाहून मनाला यातना होत होत्या. तिथल्या प्रत्येकाला धरून धरून सांगावस वाटत होत “अरे मुर्खांनो ही पिकनिक करायची जागा नाहीय, इथे शंभु राजांनी प्राण सोडलेत त्या जागेची काय ही विटंबना करताय”.....औरंगजेबाचे सैन्य जेव्हा डोळ्यात तप्त सळ्या घुसवत होते तेव्हा शंभुराजेंना जेवढ्या यातना झाल्या नसतील त्यापेक्षा जास्त यातना त्यांच्या या समाधीस्थळाची होत असलेली विटंबना पाहून होत असतील. अरे तुम्हाला काहीच कसं वाटत नाही ज्या जागेची धुळ मस्तकी लावायला हवी त्या जागेवार खेळताय, बागडताय, पिकनिक एन्जॉय करताय. शेकडो वर्षांपुर्वी परकीयांनी आपल्या राजांचा अपमान केला पण आज राजांचा अपमान करणारे कुणी परके नाही तर स्वकीयच आहेत. अहो ज्या भामा, भिमा, इंद्रायणी तीरावर संगमेश्वराचे मंदिर, संमोर शंभु राजेंची भव्य मुर्ती, पुढे कवी कलश व शंभु राजेंची समाधी इतक्या पवित्र स्थाानी काय रे हे अपवीत्र वर्तन. अरे मोजक्या पैशांसाठी आणि आणि क्षणिक आनंदासाठी बाजार मांडलाय या पवित्र स्थानाचा....

इथे आलो तेव्हा मनात वेगळेच विचार होते. पण इथे जे पाहीले ते पाहून मन अस्वस्थ झाले. शंभुराजे तुम्ही धर्मासाठी, स्वराज्यासाठी आपले प्राण दिलेत पण, हे स्वार्थी लोक ही आत्मीयता विसरुन भलतीकडे चाललेत. थांबवा हे राजे सर्व....आम्ही तिथुन थोडे पुढे गेलो जिथे तीन नद्यांचा संगम होता. भामा, भिमा, इंद्रायणी पण तिथेही तेच कोण तिथे कपडे धुतय, तर कोणी गरम होतय म्हणून थंडाव्यासाठी नदित आंघोळ करतय. अक्षरक्षा रडायला येत होत ते पाहून. इथे आपलेच नाणे खोटे तिथे इतरांना दोष काय द्यायचा. तिथे नद्यांच्या संगमाचा इतिहास आणि तुळापूरचा इतिहास नमुद असलेला एक फलक लावलेला होता. त्या फलकाच्या अगदि समोरच एका आजींनी येवून हात-तोंड धुतले. एव्हाना स्वत:चीच लाज वाटायला लागली होती. या पवित्र स्थळाचा होत असलेला अपमान सहत करतच आम्ही तिथुन निघालो. मनात एक सल कायम होती. अशा पवित्र स्थळांवर पिकनिक काढण्याइतके निगरगट्ट का झालोय आपण. या अशा पवित्र स्थळाची होत असलेली विटंबना कधी थांबणार हा एकच विचार माझ्या मनात होता किंबहुना प्रत्येक दुर्गवीराच्या मनात हाच विचार होता.



तिथून निघालो ते थेट पोचला वढु ला. मनात भिती होती इथेही तोच बाजार नसेल ना..... पण इथे तर अगदि विरुद्ध वातावरण होत. अगदी शांतता.....समोर शंभु राजेंची समाधी... लगेच सर्व समाधीकडे गेलो. माथा टेकवून समाधीचे दर्शन घेतले. माथा टेकताच अंगात अक्षरश: विज चमकुन गेली. क्षणभर तर शंभु राजेंच्या चरणावर माथा टेकतोय असं वाटल. कंठ दाटुन आला. तसाच आवंढा गिळत मी दर्शन घेतल. दर्शन घेवुन मी बाजुला झालो. सर्वानी समाधीचे दर्शन घेतले आणि शंभु महाराज, शिवाजी महाराज यांचा जयघोष केला. दर्शन झाल्यावर सर्व दुर्गवीर समाधीभोवती बसलो. "कुणीतरी बाळ इथे निजला"..... हे काव्य लावण्याची विनंती केली. काव्य सुरू झाले भिमा इंद्रायणी तीरी.... समोर भामा, भिमा, इंद्रायणीचा संगम तरळू लागला. वढु तुळा संगमावारी..... दोन पवित्र स्थान खाडकन डोळ्यासमोर उभी राहीली. मृत्युंजय संभाजी पाहून मृत्युही थिजला.....समोर एक बाणेदार, तेजस्वी व रौद्र रूप समशेरीसम उभे राहून मृत्युला आव्हान देताना दिसले. ते रुप डोळ्यातुन अक्षरश: आग ओकत होते. वाटत होते या नजरेनेच गनीम घायाळ झाले असतील. इतक्यात पुढच वाक्य कानी पडल....बाळ इथे निजला... शिवाचा बाळ इथे निजला..... हे काव्य आम्हा सर्वाना त्या प्रसंगात घेवून गेले...... वाघा सारखे आलेले शंभूराजे शिवबांसारखे जगुन, सिंहासारखे मरण झेलुन एक तेजस्वी राजा म्हणुन अमर झालेले शंभू राजे माझ्या डोळ्यासमोर तरळू लागले. कधीही कुणाला शरण न जाता प्रसंगी मरण पत्करणारे शंभु राजे शिकण्यासारखे आहेत आजच्या स्वार्थी आणि लाचार लोकांनी....खरच निस्वार्थी जगणं आणि धर्मासाठी देशासाठी बलिदान देण म्हणजे काय ?? हे शंभु राजे अभ्यासल्यावर समजतात. पण त्याआधी शंभु राजेंचा तो "निस्वार्थीपणा" शिकला तर पाहीजे.

मुजरा राजे... मुजरा तुमच्या जिद्दीला आणि चिकाटीला....तुम्ही अवघं जीवण रणांगणात घालवलं पण हार म्हणून कधी मानली नाही. आयुष्यात आलेल्या प्रचंड दु:खावर मात करून शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी जो सागररूपी पराक्रम केला तो तुमच्या बलिदानाने करुणेचा(दु:खाचा) आगर झालाय.... दगडासारखा अभेद्य (अखंड) असा सह्याद्री तुमच्या बलिदानाच्या दु:खाने अश्रुंनी भिजलाय... असा भावार्थ या काव्याच्या प्रत्येक ओळीतुन व्यक्त होत होता....या काव्याच्या प्रत्येक ओळीनुसार आम्हा सर्वांचे मन हेलावून जात होते. कितीही स्वत:ला थांबवल तरी प्रत्येकाच्या डोळ्यातुन अश्रु वाहत होते. (प्रत्येकजण ते दाखवत नव्हता इतकच) नील दादांकडे माझं सहज लक्ष गेलं. एरव्ही हसतमुख असणारा निल दादा त्याच्याही डोळ्यातुन पाणी वाहत होतं. इतर सर्वांची अवस्था काही वेगळी नव्हती. काही क्षण तिथे स्तब्धता होती. कोणीही काहीही बोलत नव्हतं....कारण प्रत्येकजण जखमी परंतु "बाणेदार शंभुराजेंना" पाहत होता. थोडा वेळ तसाच गेला कुणाच्या तोंडातुन एक चकार शब्द येत नव्हता, कसा येणार सर्वांचा कंठ दाटुन आला होता. मी तिथुन उठलो आजुबाजुचा परिसर न्याहाळु लागलो. आजुबाजुचा परिसर न्याहाळणे हे तर कारण होत खर तर डोळ्यातले अश्रु पुसायलास मी बाजुला निघुन गेलो होतो. बाजुला जावून घाईघाईने अश्रु पुसले इतक्यात मोनीश दादांनी खांद्यावर हात टाकला कदाचित त्यांना माझी ती अवस्था समजली असावी. खरच तिथे कुठेतरी शंभुराजेंच वास्तव्य असल्याचा भास झाला. तिथे थोडा वेळ गेल्यावर सर्व बाहेर येवून बसलो. सतत काहीतरी जाणवंत होत. एक वेगळ तेज आम्हाला न्याहाळतय याची जाणीव होत होती. इतकी शांतता होती की, आजुबाजुंच्या झाडांच्या पानांची सळसळ तिथली शांतता भंग करत होते. एखाद्या पक्षाचा आवाज मनात धडकी भरविण्याइतका भयानक वाटावा इतकी शांतता तिथे होती.

मनात विचारचक्र चालु होते..... तुळापूर आणि वढु दोन्हीही पवित्र स्थान... मग एका जागेवरील पावित्र्य पुर्णपणे नष्ट केलेले आणि एकाच पावित्र्य अजुनतरी जपलेल.... खरचं कलियुग म्हणतात ते हेच आपण सर्व गोष्टिंची फक्त वाट लावतोय, सर्व गोष्टिंचा फक्त बाजार करतोय.... कुठल्याही धार्मीक स्थळावर जा तिथे बाजार... कुठल्या ऐतिहासिक स्थळावर जा तिथे बाजार.... मन हेलावून जात हा बाजार पाहुन.... शंभु राजेंची समाधी असलेल्या या दोन स्थळांपैकी सरस स्थळ कोणते हे सांगायचा माझा प्रयत्न नाही, दोन्ही स्थळ माझ्यासाठी सारखीच पण त्याच पावित्र्य नष्ट केलय आपल्यातीलच काही खुशालचेंडु लोकांनी, तेही स्वत:च्या स्वार्थासाठी.... कधी थांबणार ही विटंबना....आहे का कोणाकडे उत्तर ??

**लेखात उल्लेख केलेले बाळ इथे निजला हे काव्य ऐकण्यासाठी येथे क्लिक करा :-**
**https://youtu.be/s1lc0ZcG3tg**



# दर्शन शिवजन्मभुमीचे.....



छायाचित्र :- विकीपिडीया

दि.११.०८.२०१३ रोजी आम्ही मोजके दुर्गवीर पुणे येथे एका बैठकीसाठी गेलो होतो. तसे आम्ही वेळेत निघालो पण काही तांत्रिक कारणास्तव रात्री साधारण ११ ते १२ वाजेपर्यंत जुईनगर रेल्वे स्टेशन ला बसुन गप्पा मारत होतो. (महेशचा महिमा बाकी काय ??) अगदी पोटभर गप्पा मारुन झाल्यावर आमचा महेश गाडीसहीत प्रकट झाला. आम्ही दाटीवाटीने गाडीत जागा पकडली. व्याकी-व्याकी ची रिस्क नको म्हणून मी खिडकीवर आक्रमण केले. पुढच्या प्रवासाची दिशा ठरली होती प्रथम सचिन जगताप बंधुंच्या घरी विश्राम मग पुढे एक बैठक आटोपुन गडदर्शन. सचिन बंधु फोन करुन पल पल की खबर घेत होते पण आम्ही पहाटेपर्यंत पुण्यात पोहोचणार हे नक्की असल्याने आम्ही सचिन बंधुंना झोपायचा सल्ला दिला. मध्येच कुठेतरी काळोखातला फ्राईड राईस खावुन आम्ही पुढचा प्रवास सुरु केला. पहाटे सचिन दादांच्या घरी पोहोचुन जागा मिळेल तस आडव तिडव झोपुन सकाळी ७:०० पर्यंत आराम केला. श्रमदान मोहिम नसल्याने सर्व आरामात होतो. पहिला चहा मग इडली - चटणीचा नाष्टा येणार होता. अगोदरच भुक लागलेली त्यात इडली-चटणी म्हटल्यावर आम्ही दातांना धारच काढुन बसलो होतो. नाष्टावर उभा-आडवा हात मारुन आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. नियोजीत बैठक पार पाडुन निघालो किल्ले हडसर च्या दिशेने. वाटेत दुर्गवीर बंधु स्वरुप पुरवंत यांच्या घरी थोडा विश्राम व चहापान करुन हडसर च्या दिशेने निघालो. खुप लांबचा पल्ला गाठुन आम्ही किल्ले हडसर च्या पायथ्याशी पोहोचलो पण गड चढाई व परतीचा प्रवास याचे नियोजन काही जमत नव्हते. मग आमच्या प्रशांत बंधुंनी आणलेले चकली आणि स्विट खात खात गडावर जायचे की नाही याचा विचार करत होतो. तेवढयात तिथे काही गावकरी आले त्यांनी पावसाळयात आणि इतक्या उशिरा गड चढणे धोकादायक असल्याचे सांगितले. त्यामुळे गावकरयांचा सल्ला मानुन मागे फिरुन शिवनेरीवर जायचे ठरवले. सचिन बंधुंची थोडी निराशा झाली पण पर्याय नव्हता आम्हाला पुन्हा मुंबईला परतीचा प्रवास करायचा होता.

ठरल्याप्रमाणे शिवनेरीच्या दर्शनास निघालो. मनात खुप औत्सुक्य होते की आपण शिवजन्मभुमीचे दर्शन घेणार आहोत. गडाची चढाई सुरु केली. सर्वसाधारणपणे कोणताही गड चढताना मन भरुन येत. मन आपोआप शिवकाळात जात. आजुबाजुला मावळे असल्याचा भास होतो. आपण वर राजांच्या भेटीलो चाललोय अस वाटत राहतं. पण शिवनेरीच्या पायथ्यापासुनच मन पिळवटुन निघत होतं. आजुबाजुला गार्डनसारखे झालेले बांधकाम गडाचे मुळ स्वरूप नष्ट करत होते. दोन्ही बाजुंना सिमेंटीकरण आणि परदेशी झाडांची लागवड !! का ?? कशासाठी ?? ज्या ऐतिहासिक वास्तुचे जतन व्हायला हवे त्याचे जिर्णोद्धार / नुतणीकरण कशासाठी ?? खरं तर त्यांच संवर्धन व्हायला हवं नुतनीकरण नाही. पुढे महादरवाजापाशी गेला तिथे काहीतरी चुकतय अस वाटलं . नंतर लक्षात आला मुळ दरवाजा जो गोमुखी असावा जो बहुतांश किल्ल्यांवर असतो तो अगदिच निमुळता करण्यात आला आहे. म्हणजे मुळ दरावाजाचे अस्तित्वच नष्ट करण्यात आले होते. आजुबाजुला असलेल गार्डनच स्वरुप, पिकनीकच स्वरुप पाहुन मन खिन्न झाले होते. पुढे शिवजन्माची प्रतिकात्मक जागा म्हणून बांधण्यात आलेली इमारत ते ठिकाण डोळयात साठवुन घेण्याचा प्रयत्न करतोय तर तिथेही खुशालचेंडु पर्यटक आडवे आले.



जस देवारयात जावुन बसल्यावर मन:शांती मिळते तस या पवित्र स्थळी बसल्यावर शांतता वाटावी ही अपेक्षा मात्र तिथेले पर्यटक फोल ठरवत होते. सर्वांचा नुसता गोंधळ, आरडा-ओरडा. जिथे बसल्यावर इतिहासाच्या आठवणीने मन भरुन यायला हवे तिथे हा गोंधळ पाहुन मन हेलावून जात होते. वरती गेलो तर एक तरुण चक्क फुटबॉल घेवून आला होता. खेळण्याअगोदरच त्याला समजावलं ही खेळण्याची जागा नाहियं. पुढे अजुन खुप काही सहन करायचं बाकी होत एक तरुण तर चक्क इतकी पिवुन आला होता की त्याला स्वत:चा तोल सावरता येत नव्हता. हा सगळा प्रकार सहन होत नव्हता म्हणून गड उतरायला सुरुवात केली तर तिथे एक तरूण चक्क सिगारेट फुंकताना दिसला. प्रथम मी त्याला मराठीत समजावल पण कदाचित मराठी समजल नसावं म्हणुन मग हिंदीत समजावलं. त्यानेही जास्त काही न बोलता चिगारेट चटकन विझवली.

शिवनेरीवरुन परत निघताना मनात खुप प्रश्न होते. गडावर जपण्यासारखे खुप काही आहे. पाण्याच्या टाक्या, त्याच्या बाजुला शिवलिंग, एका खडकांत असलेले खोदिव टाके, गडाच्या बाजुला लेणीसदृष्य वास्तु मग या सर्व वास्तु जपण्याऐवजी गडावर इतरत्र नुतणीकरण कशासाठी. बाकी हौशे नवशे पर्यटक हा तर एका बिघडलेल्या मानसिकतेचा भाग आहे तो कधी सुधारणार कुणास ठावुक ? ?



## सुरगडाशी सुर जेव्हा जुळती



दुर्गवीर सोबत मी खुप गडदर्शन मोहिमा केल्या पण प्रत्येक मोहिमेचा एक वेगळा अनुभव असतो. अशाच अनेक अनुभवांपैकी दि. ७ ऑक्टोबर २०१२ चा एक मजेदार, थरारक असा अनुभव ज्यानंतर माझे सुरगडाशी कायमचे नाते जुळले. तसे पाहता गणेशोत्सवातील दीर्घ विश्रांतीनंतर ही माझी पहिलीच श्रमदान मोहीम होती. त्यामुळे माझा उत्साह तर उसेन बोल्ट पेक्षा वेगाने वाहत होता. (उसेल बोल्ट नाही माहीत बरं... पी. टी. उषा समजा...) तर माझा उत्साह पी. टी. उषा पेक्षा वेगाने वाहत होता. कधी एकदा गडावर जातोय आणि काम करतोय असं झालेल. त्या शनिवारी मला चक्क सुट्टी असल्याने शनिवारी सकाळीच निघणार होतो. जाणारे आम्ही इन, मीन साडे तीन होतो. त्यात १ मी, २ संतोष दादा, ३ सचिन रेडेकर आणि उरलेला आमचा महेश दादा. बाकीचे दुर्गवीर काम धाम निपटाके रात्री ८ च्या दिवा-रोहा ने सुरगड यायला निघणार होते. अगोदर क्वालीस ने जायचं ठरलं मग ते कॅन्सल करीत सकाळच्या दिवा पॅसेंजर ने जायचं ठरल. त्यानुसार पनवेल ला मी आाणि संतोष दादा पोहोचलो. पण आमचे सचिन बंधु आणि महेश बंधु यांचा पत्ताच नव्हता. कोणीच वेळेवर नसल्याने ट्रेन चुकणार हे नक्की होत त्यामुळे ट्रेन च तिकीट काढुन पैसे का फुकट घालवा हा मध्यमवर्गीय विचार आम्ही केला. देवाच्या कृपेने आज ट्रेन नेमकी लेट होती. आणि तेवढयात सचिन बंधु आले आणि आम्ही धावत पळतच ट्रेन पकडली. (ते ही विदाऊट तिकीट बरं का??). चायनिज भेल, बिस्कीट खात खात प्रवास सुरू होता. एकमेकांच्या गावच्या आठवणी, घरची परिस्थिती अश्या अनेक विषयांना हात घालुन संतोष दादाने मला बोलत केल. एका क्षणाला मलाही भरुन आलं. कारण मला माझ्याबद्दल, माझ्या घरच्यांबद्दल फारसं कोणी विचारलं नव्हतं. दुर्गवीर कुटुंबाचे हेच रहस्य आहे इथे प्रत्येक जण प्रत्येकाचा एक संस्था सभासद म्हणून नाही तर एक कुटुंब सदस्य म्हणून विचार करतो. पुढे असंच एकमेकांची सुख वाटुन घेत प्रवास सुरू होता तोवर कसु स्टेशन ला ट्रेन पोहाचली पुढच स्टेशन नागोठणे होतं. कसु स्टेशन ला ट्रेन बराच वेळ थांबुन होती. त्यामुळे अगदिच विदाउट तिकीट नको म्हणून आम्ही तिघांचे मिळुन तब्बल रोख रु.६/- खर्च करुन तिकीट काढले. नागोठणे ला उतरुन भाजी चपातीची व्यवस्था करुन एका प्रायवेट क्वालीस मधुन खांब गावापर्यंत गेलो.

आता तिथुन गडाच्या पायथ्याशी चालत जायचं होतं. या प्रवासात एक विनोदी प्रसंग घडला. मी आणि संतोष दादा पुढे चाललो होतो सचिन दादा आमच्या मागुन येत होता. आमच्या समोरुन एक कुत्रा येत होता, त्याला पाहुन दादा बोलला "हे बघ तु आम्हाला चावणार असशील तर एक लक्षात घे तु एकटा आहेस आणि तिघे, तु त्या वाटेने जा आम्ही सरळ जातो." दादाचं हे बोलणं कुत्रा (बिचारा) जागेवर उभा राहुन लक्षपुर्वक ऐकत होता. थोडा विचार करुन आम्ही जोवर जात नाही तोवर,तो तसाच उभा राहीला.



आम्ही जसे पुढे गेलो तस त्याने धुम पळाले केलं. कदाचित त्याने हे ओळखल असावं संतोष दादा त्याला बोलुन बोलुन मारेल, मी त्याला न बोलता मारेन, सचिन त्याला धरुन धरुन मारेल.....

शेवटी पार्टीच्या घरी पोहोचलो तिथे पोहोचुन मागुन येणारया लेट लतिफ महेश बंधुंची वाट पाहत राहीलो. तोवर अगोदरच सांगितल्याप्रमाणे माझा उत्साह पि. टी. उषा पेक्षा वेगान वाहत होता त्यामुळे आम्ही पाईप, चेन पुली, २-३ बादल्या, २-३ घमेली, फावडा अश्या भरपुर वस्तु घेतल्या. जणु काय एका रात्रीत आम्ही गडच काय संपुर्ण डोंगर साफसुफ करणार आहोत. इन मिन साडे तीन माणंस काय काय नेणार मग थोड सामान कमी केलं. आणि संचिन बंधुंकडे चेन पुली दिली.मी बॅग आणि पाईप घेतला. आज रात्री गडावर वस्तीला राहायचं या उद्देशानेच आम्ही निघालो होतो. पायथ्याच्या विहीरीजवळ आमच्या शिदोरीवर ताव मारला आणि गड चढाईला सुरुवात केली. अर्ध्या रस्त्यात सचिन बंधुंकडील चेन पुलीच ओझ सांभाळायला घेतलं. तेव्हा समजलं सचिन बंधु धापा का टाकत होते. अगोदर त्यांच वजन त्यात चेन पुलीच वजन. पुढे सुरगडचा थोडासा कठिण भाग त्या दगडी घळीतुन वर चढलो. आणि मुख्य दरवाजातुन शिवरायांचा जयघोष करत पुढे गेलो.

गडावर पोहोचल्यावर टाक्यांची पहाणी केली. ८ ते १० फुट खोल टाक त्यात ४-५ फुट चिखल असावा त्यात मी साडे पाच फुटाचा माणुस कसा काय पोहु शकतो (तसं मला पाउलभर पाण्यातही पोहता येत नाही...) मग सचिन बंधु टाक्यात उतरले. एक पाईप टाकुन त्यातले पाणि बाहेर सोडण्यात आले. रात्रभर ते पाणी साफ होणार होत मग सकाळी टाक साफ करता येणार होत. एव्हाना रात्रभर गडावर राहायच आम्ही पक्क केल होतं. धान्यकोठार सदृष्य वास्तुत छप्पर बांधुन राहायचं ठरलं. मी आणि संतोष दादाने गवताचा बेड तयार केला फक्त छप्पर तेवढ बनायच बाकी होतं. मग आमचे वास्तुविशारद महेष बंधु वेगवेगळ्या आयडीया देत होते आणि आम्ही ते करत होतो. पण एका बाजुच कसबंस उभ केलेल छप्पर दुसरया बाजुच छप्पर उभ होण्या अगोदर पडत होत. आणि जेव्हा वारा आणि पाऊस सुर झाला तेव्हा तर ते छप्पर कमी चाळणच जास्त वाटत होतं. आता मात्र महेश बंधुंच्या वास्तुविशारद च्या "बोगस कलेवर" टिकेचा भडिमार करुन तिथुन निघालो रात्रभर पावसात भिजत राहणं शक्य नव्हतं हे संतोष दादांनी ओळखलं होत म्हणून मुख्य दरवाजातल्या दगडी घळीच्या इथे असलेल्या गुहेत रहायचं ठरलं. एव्हानां अंधार पडला होता पायाखाली काहीच दिसत नव्हतं जे काही फिरत होतो सर्व अंदाजावर चाललं होत. नाही म्हणायला आमच्याकडे एक बॅटरी होती पण त्याचा उजेड इतका होता की बॅटरी चुकुन दुसरया डोंगराच्या दिशेने मारली तर पक्षी सकाळ झाली समजुन किलबीलाट करतील. "वरुण राजा" वरुन जो टॉर्च मारत होता(चमकणारी विज)त्याच्या बळावर सगळं चालल होतं. जो रॉक पॅच चढा-उतरायला इतर लोक सकाळच्या उजेडातही घाबरतात तो पॅच आम्ही एवढ्या अंधारातही सहज पार केला. गुहेजवळ पोहोचलो आता आमच्या अगोदर गुहेत कोणी गेल नाहीय ना ह्याची खात्री करायला मी गुहेत गेलो (आत जाताना मनातल्या मनात "मे आय कम इन अस म्हटलं". आत कोणीच नव्हतं फक्त एक वटवाघुळ आणि एक पाल (पाल कसली पाला होता तो). मी आत जाताच पालीने "काढता पाय" घेतला आणि वटवाघुळही फार "वटवट" न करता निघुन गेलं. त्या दोन फुटाच्या गुहेत आम्ही साडे पाच सहा फुटाची माणसं फोल्डिंग पोजीशन मध्ये बसलो. दादाने अजुन पुढे जायचा निर्णय घेतला. जरा पुढे गेल्यावर डाव्या बाजुला एक डोंगर कपारी आहे तिथे पोहोचायचं ठरल आता मात्र मला "घर का ना घाट का" याचा खरा अर्थ कळला. पुढे काळोखातुन सरपट सरपटत कपारीपर्यंत पोचलो एके ठिकाणी पाय घसरुन चांगला एक दोन फुट खाली गेलो पटकन दादाने माझ टि शर्ट पकडल आणि पायाखाली एक दगड मिळाला (तेव्हा मला अजुन एक म्हण समजली घसरणारयाला दगडाचा आधार).



कपारीत पोहोचल्यावर एक वेगळाच अनुभव घेतला. कपारीची रचना अशी होती की बाहेर धो -धो पाउस पडत होता पण कपारीत अजिबात पाणि येत नव्हते. कदाचित जुन्या काळात मावळे इथेच बसुन पहारा देत असावेत. मलाही एक क्षण मी मावळा आहे आणि मुख्य दरवाजात पहारेकरी म्हणुन बसलोय अस वाटत होत. खाली पाहीलंत तर एका बाजुला गावातल्या लाईट चा प्रकाश तर दुसरया बाजुला काळाकुट्ट अंधार. पहाटे गडाखालुन फोना फोनी सुरू झाली. आम्ही तोवर पाण्याच्या टाकीजवळ गेलो टाक्यात आता फक्त १-२ फुटच पाणी राहील होतं. आता मी बिनधास्त पणे टाक्यात उतरणार होतो. पाण्यात एक पाणसाप दिसला पण तो काही करणार नाही याची आशा होती पण खात्री नव्हती म्हणुन सावधपणे कामाला सुरूवात केली. थोड्यात वेळात मुंबई पुण्याचे ४० दुर्गवीर त्या टाक्याच्या कामाला लागले. हर हर महादेव, जय भवानी जय शिवराय अशा घोषणा देत काम सुरुच होत. काही जण दमले की आम्हाला बिस्कीट, जाम, ब्रेड पुरवुन आम्हाला मदत करत होते. अधुन मधुन “वरूण राजाही” आमच्या पाठीवर शाबासकीची थाप (पावसाची सर) मारत होता. टाक जवळपांस ८०% साफ झाल होत. सुरूवातीला दिसलेला पाणसाप आम्हाला पुन्हा दिसला. पुणे येथुन आलेल्या एक सर्पमित्रांनी त्याला इज्जत मध्ये बाहेर सोडुन दिल. संतोष दादाची तब्येत ठिक नव्हती म्हणून आम्ही त्यांना टाक्यात उतरु देत नव्हतो पण गडावर आलो आणि श्रमदान नाही त्यामुळे दादाही टाक्यात उतरले. ७:३० ते १:०० पर्यंत अविरतपणे काम केल्यावर आता बरेचसे थकले होते. एका आजारी दुर्गवीराला दुसरया वाटेने खाली पाठवुन टाक्याच शेवटच्या टप्प्यातल काम सुरु केलं.

संपुंर्ण टाक साफ झालय अस वाटल्यावर आम्ही जायला निघालो पण अमित शिंदेच मन काही भरत नव्हतं त्याला अजुन थोडा वेळ मिळाला असता तर त्याने पॉलिश पेपर ने घासुन पुसुन टाक साफ केल असतं गड उतरलो, खाली जेवणं केल, प्रतिक्रीया घेतल्या नंतर परतीचा प्रवास करत मुंबईत पोहोचलो पण मन मात्र अजुनही सुरगडावरच होतं .....



# संताप....



आजवरच्या दुर्गवीरसोबतच्या अनेक मोहिमांमध्ये वेगवेगळे अनुभव आले. प्रत्येक गडदर्शन मोहिमेनंतर मन बहरून जायचं. निसर्गाच्या ताकदीचा हेवा वाटायचा. आपल्या गौरवशाली इतिहासाचा अभिमान वाटायचा. पण आजची विसापूर व लोहगड मोहिम अक्षरशः संताप देवुन गेली. एक वेळ अस वाटत होत की विसरुन जाव सर्व जबाबदारी, करीयर आणि इतर गोष्टी आणि घ्यावी तलवार आणि कापुन काढाव एकेकाला.

आम्ही दुर्गवीर सकाळची इंद्रायणी एक्सप्रेस पकडून लोणावळा, तिथुन मरोळ येथे पोहोचलो. तिथुन चालत विसापुर च्या पायथ्याशी पोहोचलो. तिथे लोहगड च्या दिशेने जाणारया गाड्या दिसल्या त्यात पण दारुच्या बाटल्या घेवून जाणारी टवाळ मुल (मुल कसली कार्टी) दिसली. डोक्यात संतापाची ठिणगी पडली. गावकरयांना याबाबत विचारल तर, आम्ही काय करणार आम्ही विचारल तर दमदाटी करतात !! अशी मुळमुळीत उत्तर मिळाली. तो राग तसाच डोक्यात ठेवुन आम्ही विसापुर ची चढाइ सुरू केली. काही ओळखीचे दुर्गप्रेमी भेटले त्यांची भेट घेवून गडाच्या माथ्यावर पोहोचलो. पण तिथेही काही वेगळी अवस्था नव्हती. जागोजागी जोडपी आडोशाला बसलेली दिसत होती. एका ठिकाणी मोठमोठ्याने गाणी लावून मुल-मुली नुसता धिंगाण करत होती. त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्यात स्त्रियांचा भरणा असल्याने आम्ही फार काही बोलु शकलो नाही. माझ्या सहनशक्तीच्या पलिकडे ते सर्व चालल होतं. मी तिथुन दुर जावून उभा राहीलो. गडांची विटंबना पाहुन रडायला येत होत आणि ते अश्रु पावसाच्या पाण्यात विरून जात होते. गर्द धुके आणि अधुन मधुन मुसळधार पाऊस झेलत आम्ही गडदर्शन केल. शेवटी बिरुदावली देत आम्ही गड उतरायला लागलो. मुसळधार पाऊस झेलत आम्ही गड उतरलो पण गडाच्या पायथ्याशी जे पाहीलं ते झेलु शकलो नाही. एका गाडीत मोठ मोठ्यांनी डिजे लावुन मुल नाचत होती. त्या अश्लिल नाचगाण्यात मुलीही आघाडीवर होत्या. एकमेकांशी ते बोलत होते त्यावरून बहुतांश मुल-मुली मराठीच वाटत होते. आता आमची अवस्था आपलेच दात आणि आपलेच ओठ अशी झाली होती. गाडीचा नंबर पहावा म्हणून पुढे गेलो तर गाडीत मला भलतेच दृष्य दिसले. ती मुल तर दारु पिवुन धिंगाणा करत होती मग या मुली काय XXXX पिउन आलेल्या का ? या पोरींचे आई-बाप यांना सोडतात कसे या मुलांबरोबर. या पिकनिक ला जातात तोवर ठिक पण राजरोसपणे हे असले अश्लिल चाळे करताना लाज कशी वाटत नाही या मुलींना. स्त्री हा निसर्गाचा अद्भुत अविष्कार.... एक स्त्री ही कायम जबाबदारीने वागते. मग ती जबाबदारी मुलीची असो वा बहिणीची.... बायकोची असो वा आईची..... आमच्या आई - बहिणींनी तर त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली. पण या लाज सोडलेल्या टवळ्या पोरींच काय करायच ? ? बर यांच्यावर हात उचलावा तर स्त्रीवर हात उचलल्याचा गुन्हा दाखल व्हायचा. हे झाल मुलींच बर जेवढी जबाबदारी मुलींची तेवढी त्यांच्यासोबत असणारया मुलांची सुद्धा असते तुम्हाला हे अस लाज सोडुन वागायच लायसन्स कोणी दिलय.....हा सगळा किळसवाणा प्रकार अनुभवून आम्ही निघालो लोहगडच्या दिशेने.



लोहगडच्या पायथ्याशी असणारया हॉटेलमध्ये जेवलो तर तिथे पण कहर एक प्लेट जेवण रु.१६०/- क्वलिटी तर अतिशय फालतु. ही फसवणुक सहण न झाल्याने हॉटेल मालकाला थोड ज्ञानामृत पाजुन आम्ही लोहगड चढायला सुरुवात केली. गड चढताना काही जोडपी आणि काही अतिउत्साही तरुण यांची चाललेली फालतुगीरी आता सहनशक्तीच्या पलिकडे चालली होती. प्रत्येक दुर्गवीर शांतपणे चालत होता पण सर्वांच्या मनात आग धुमसत होती. फक्त त्या आगीचा भडका उडायचा बाकी होता. काही तरुण काळया पिशवीतुन काही वस्तु घेवुन जात होते आणि तिथुन जाणारया स्त्रियांची मस्करी करत होते. (त्यांच्या) सुदैवाने पिशवीत स्प्राईट होते पण रस्यातुन स्त्रियांची मस्करी करण्याबाबत “छोटिशी समज” देवून आम्ही पुढे निघालो. जरा पुढे गेलो तर तिथे एक तरुण सिगारेट फुंकताना दिसला मग त्याच्या “श्रीमुखात भारताचा नकाशा काढला”.. सिगारेट विझवुन माफी मागुन तो निघुन गेला. पुढे सिक्युरिटीचा दंडुका घेवुनच आम्ही पुढे निघालो. पुढे एका गुहेत ७-८ तरुण दारु पित बसले होते. आम्ही सगळे अचानक आत घुसल्यावर पळापळ सुरु झाली. त्यांनी सगळ सामान घेवुन खाली दाखवायची तयारी केली शिवाय खाली जाईपर्यत हाता-पाया पडत होते त्यामुळे फारसे हात चालवायची वेळ आली नाही. ती सर्व मुल मराठीच होती आणि त्यांना मदत करणारा मुलगा हा स्थानिक गावातलाच मुलगा होता. स्थानिक असल्याने त्याचा आवाज हळु हळु वाढत होता पण दंडुका इतर उपस्थितांचा रोष पाहुन तोही शांत झाला. गड पाहुन पुन्हा उतरायला सुरुवात केली तेव्हा पुन्हा एक वाफेचे इंजिन दिसल त्याचेही टायर पंक्चर करुन आम्ही गड उतरलो.

या मोहिमेत आम्ही काय मिळवलं तर फक्त आणि फक्त मनस्ताप. खर तर तिथल्या तरुणांना मारुन मुटकुन हा प्रश्न सुटणारा नाहीय. गडावर जाणारया प्रत्येकाने विचार करायला पाहिजे. ज्या गडांना स्वराज्यात टिकविण्यासाठी आपल्या मावळ्यांनी रक्त सांडल तिथे आपण अशी दारुची पार्टी कशी काय करु शकतो. आज माणुस कितीही चंद्रावर पोहोचला, किंवा कितीही नास्तिक असला तरी देवघरात किंवा मंदिरात जाताना निदान चप्पल तर बाहेर काढतोच ना. मग हेच पावित्र्य या गडांच आहे. संवर्धन, संरक्षण, स्वच्छता वगैरे गोष्टी करायला वेळ आणि इच्छा नसेल तर नका करु पण निदान या गडांवर ही अशी घाण तर करु नका.....



# काय हे दुर्दैव....



गुढिपाडव्याच्या आदल्या दिवशी शंभु राजांनी मृत्युला कवटाळले. जो मृत्यु कुणासाठीही थांबत नाही त्या मृत्युला शंभु राजांनी अक्षरश: रोखुन धरल. स्वत:स बादशाहा समजणारया औरंगजेबाची कीव करत आणि संपुर्ण स्वराज्यात संघर्षाची मशाल पेटवत शंभु राजे नावाचा एक वणवा शांत झाला. शंभु राजे आयुष्यभर स्वराज्यासाठी वणव्याप्रमाणे अक्षरश: जळत राहिले, ज्याची उब अख्व्या हिंदुस्थानाने पुढची अनेक वर्ष अनुभवली. एकढ मोठ बलिदान देवुनही या ज्वलंत योद्ध्याची जाणीव फार कमी लोकांनी ठेवली. आज वढु सारख्या ठिकाणी पिकनिक म्हणून जाणारे महाभाग पाहीले की, शंभु राजेंची हात जोडुन माफी मागावीशी वाटते. संभाजी महाराजांच्या नावाने ३०-४० पानांत जातीय इतिहास शिकविणारयांना उलट लटकवुन फटके द्यावेसे वाटतात.

रत्नागिरी मध्ये संगमेश्वर येथे शंभु राजांसारख्या सिंहाच्या छाव्याला दगा करुन पकडलं. आज त्या ठिकाणी एक पडका वाडा आहे. बाजुला अत्यंत प्राचीन अशी मंदिर आहेत. स्थानिकांच्या आख्यायिकेनुसार अशी ३६० मंदिर सभोवतालच्या परिसरात आहेत. सद्यस्थितीत फक्त ४ मंदिर शिल्लक आहेत. मिळालेल्या माहीतीनुसार ही मंदिर कुणा सरदेसाई नावाच्या व्यक्तीच्या मालकीच्या जागेत आहेत. जरी ही मंदिर कुणाच्या खाजगी जागेत असली तरी या मंदिरांच संवर्धन होण अत्यंत आवश्यक आहे. स्थानिकांची इच्छा असुनही जमीनमालक त्या मंदिरांच्या संवर्धनास परवानगी देईल का हा प्रश्नच आहे.

आमच्यासारख्या इतिहासप्रेमी / शिव शंभु प्रेमींची हीच इच्छा आहे की, ती जमीन त्याच्याच मालकीची राहो पण त्या जमिनीतील पुरातन मंदिरांच किमान जतन व्हाव !! एका बाजुला भुमी अधिग्रहणच्या चर्चांना उत आलाय. गड किल्ले संवर्धनाचे ढोल वाजतायत पण या इतिहासाच्या मन की बात कोणी करणार का ??



# सिंहगड चोरीला गेलाय.....



छायाचित्र :- विकीपिडीया

सर्व शिवभक्त, दुर्गप्रेमी, इतिहास प्रेमी व इतर प्रेमींना कळविण्यास अत्यंत खेद होत आहे की, मुंबई पासुन जवळ पुणे येथील ऐतिहासिक सिंहगड अज्ञातांकडून चोरीला गेलाय. शेकडो वर्षांपासुन अस्तित्वात असलेला व उपलब्ध कागदपत्रांनुसार सिंहगड नावाने प्रसिद्ध असलेला सिंहगड आज आज सदर ठिकाणी अस्तित्वात नाही.

तानाजी मालुसरेंनी जेथे स्वत:चे प्राण अर्पुण गड राखला तो गड आज आपण गमावलाय. काही शिवप्रेमींच्या म्हणण्यानुसार अतिरेकी पर्यटक, अश्लिल प्रेमी यांनीच हा गड चोरून गडाच्या जागेवर एका गार्डनची उभारणी केली असावी. सदर किल्ल्याला (गार्डनला) भेट दिल्यावर गडसंवर्धनाच्या नावावर चाललेला बाजार, अश्लिल प्रेमींचा सुळसुळाट दिसुन येतो. मुळात या ठिकाणी गड होता का ह्याबद्दल साशंकता निर्माण व्हावी अशी या वास्तुची अवस्था करण्यात आलेली आहे. परंतु मावळ्यांचे बलिदान व ऐतिहासिक नोंदी यामुळे गडाचे अस्तित्व नाकारता येत नाही.

सदर जागेवर तानाजी मालुसरे व राजाराम महाराज यांची समाधी आहे. लोकमान्य टिळक यांचा वाडा, दोन - तीन पाण्याची खोदिव व बांधीव टाकी आढळल्याने सिंहगड हा गड किंवा किल्ला होता व तो राखण्यासाठी मावळ्यांनी रक्त सांडल्याचे स्पष्ट होतेय. राजाराम महाराजांनी शेवटचा श्वास याच गडावर घेतल्याने सदर जागेचे पावित्र्य लक्षात न येण्याइतके बिनडोक कोणीही नसेल.

सदर गड खरच चोरीला गेलाय की, आपल्या खुशालचेंडु जनता व सरकारने या सिंहगडाचे रुपांतर गार्डन मध्ये केलय का ? हा विचार करण्याचा मुद्दा आहे.



# व्रत गडसंवर्धनाचे.....



माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षेत्रात माझे स्वत:चे काही नियम आहेत. प्रत्येक क्षेत्रात म्हणजे घर, नोकरी किवा इतर ठिकाणी. या प्रत्येक क्षेत्रात माझी एक सिमारेषा मी ठरवली आहे आणि ती सिमारेषा मी पार केली तर मी बाद हा अलिखीत नियम मी स्वत:शीच केलाय..... माझ्या दुर्गसंवर्धन क्षेत्रातील अर्थात दुर्गवीर मधील सिमारेषा आहे. संतोष हसुरकर....... या सिमारेषेला मी कधी पार करु शकत नाही..... माझ्या या सिमारेषेचा हा परिचय......

नाव :- संतोष गुंडु हसुरकर

मुळ गाव :- बेळगाव - महाराष्ट्र

सध्याचे वास्तव्य :- सांताक्रुज (मुंबई)

गड किल्ले आणि इतिहास याच्याविषयीची आवड बालपणापासुनच होती. शालेय सहलींच्या दरम्यान गड किल्ल्यांबाबात निर्माण झालेली आवड पुढे गडसंवर्धनाच्या कर्तव्यात बदलली. समाजसेवेचे बाळकडू वडील श्री. गुंडू संतु हसुरकर यांच्याकडुनच मिळाल्याने या कार्याबाबत आपोआपच रुची निर्माण झाली. श्री. गुंडू संतु हसुरकर बेळगाव सिमाभागातील थोर समाजसेवक होते. गोरगरीबांना प्रत्येक गोष्टित मदत करुन त्यांच्याशी आपुलकीचे नाते निर्माण करणारे श्री गुंडू संतु हसुरकर हे गत पिढीचे आदर्श होते. हाच समाजकार्याचा वारसा पुढे चालविण्याचे कार्य श्री. संतोष हसुरकर करीत आहेत. संतोष हसुरकर यांनी २००८ साली दुर्गवीर प्रतिष्ठान नावाच्या संस्थेची स्थापना केली. अगोदर वैयक्तिक गड किल्ले पाहायचा संकल्प नंतर दुर्गवीर प्रतिष्ठानच्या श्रमदान मोहिमांमध्ये बदलला. प्रत्येक रविवारी किंवा सुट्टिचा दिवस उजाडला की कुदळ, फावड घेवून सोबत येतील त्यांना घेवून श्रमदान करायला सुरूवात केली. कोणतेही अनुदान नाही की आर्थिक मदत नाही स्वखर्चातुन बेभान होवून रायगड जिल्ह्यातील मानगडपासुन सुरू केलेला प्रवास आज सुरगड, मृगगड, भिवगड, साल्हेर, सामानगड, वल्लभगड, कलानंदीगड इथवर येवुन पोहोचला. आज महाराष्ट्रभर ७-८ गडांवर एकाच वेळी स्थानिकांच्या सहकार्याने गडसंवर्धन सुरू आहे. गड संवर्धनासोबत शस्त्र व गड किल्ले छायचित्रे प्रदर्शनातुन जनजागृती, गरीबांना शालेय वस्तु वाटपांतुन शिक्षणाविषयी जागृती निर्माण करणे, गरीबांना विविध गृहोपयोगी वस्तु वाटप करुन त्यांना आयुष्यात पुढे जाण्यास मदत करणे, विविध गडदर्शन मोहिमांमधुन गड किल्ल्यांबाबत आवड निर्माण करणे ह्यासाठी संतोष हसुरकर दुर्गवीर च्या साहाय्याने सतत प्रयत्नशील असतात. दुर्गवीर प्रतिष्ठान व संतोष हसुरकर यांना विविध क्षेत्रातुन पुरस्कार मिळाले परंतु "दुर्गवीर ला मिळालेला प्रत्येक पुरस्कार हा एकट्या संतोष हसुरकर चा नाही तर दुर्गवीरच्या कार्यात साथ देणारया प्रत्येक हाताचा आहे" हे संतोष हसुरकर आवर्जुन सांगतात.

संतोष दादा हे एक अजब रसायन आहे. संतोष दादांच्या वाणीत एक जादु आहे. संतोष दादांनी बोलाव आणि समोरच्याने ते हसत हसत मान्य करावं. वैयक्तिक आयुष्यात कितीही मोठी संकटे आली तरीही दुर्गवीर च्या कार्यावर त्याचा परिणाम होवू न देण्यासाठी दादा नेहमी धडपडत असतात. इतिहास असो वा व्यक्ती त्याचा उलगडा करण्याच कसब संतोष दादांना जन्मजातच उपजत असावे. माझ्या दुर्गवीरच्या प्रवासात संतोष दादांमुळे एका मार्गाने घडता आल. मी कधी दुर्गवीर सोबत जोडलोच नसतो तर आज मी कुठे असतो याची कल्पनाच करवत नाही. संतोष दादांनी घेतलेले "गड संवर्धनाचे व्रत" पुर्ण करण्यात माझाही खारीचा वाटा असेल यातच मी माझ भाग्य समजतो.



तपस्वी.... समरभुमी उंबरखिंड




चेहरा निर्वीकार....

उर्जा प्रचंड या शब्दापलिकडची !!

धेय्य... इतिहासाचा प्रसार आणि प्रचार !!

छायचित्रातील या व्यक्तीच्या नावातच इतिहास दडलाय..... किरण शेलार

किरण शेलार दादांशी पहिली भेट आजच (१६/०८/२०१५) झाली. वेळ होती उंबरखिंड दर्शन मोहिम.... खंडाळापासुन डोंगरदरयातुन उंबरखिंडीच्या या परिसरातील प्रतिकात्मक स्मारकापर्यंतचा प्रवास..... संपूर्ण प्रवासात किरण दादांनी त्यांच्या बोलण्यातुन इतिहास अक्षरक्ष: डोळ्यासमोर जिवंत केला. दुतर्फा पसरलेल्या सह्याद्रीकडे पाहिले की, जणु खानाला घेरण्यासाठी शिवरायांनी नेमलेल्या ४ तुकड्यांमधील मी एक मावळा आहे असा भास होत होता. सभोवतालचा सह्याद्री सतत साद देत होता. या सुवर्णक्षणांची साथ दिली किरण दादांनी !! गेली १५ वर्ष उंबरखिंड मोहिमेच आयोजन किरण दादा करतात. कोणतेही व्यावसायीकीकरण वा गाजावाजा न करता या मोहिमेचे आयोजन केले जाते. ऐतिहासिकदृष्ट्या महत्वपुर्ण असणारया उंबरखिंडीचा इतिहास सर्वसामान्यांना समजावा हा एकमेव भाबडा आशावाद डोळ्यासमोर ठेवुन दादा या मोहिमेचे आयोजन करतात. माझ्यासोबत आलेल्याने दुसरया १०-२० जणांना घेवून या मोहिमेत सहभागी व्हाव किंवा अशा मोहिमांच आयोजन करावं हा त्यांचा उद्देश.

वीस हजार सैन्य व प्रचंड शस्त्रसाठा सोबत घेवून कारतलब खान शिवरायांवर चाल करुन येत होता. या कारतलब खानाला अवघ्या २ हजार सैन्यानीशी नेस्तनाबुत करण्याचा भिमपराक्रम शिवरायांनी केला होता. इतिहासात ही लढाई अत्यंत कमी वेळात व अत्यंत कमी सैन्यानिशी लढली गेली. या प्रचंड सैन्याला नेस्तनाबुत करून प्रचंड संपत्ती व शस्त्रसाठा जप्त करण्यात आलेल्या लढाईचा आदर्श आजही जगभरात घेतला जातो. या लढाईतुन शिवरायांचे संयम, वेळेचे व्यवस्थापन, आक्रमकता, क्षमाशीलता, मुत्सदीपणा हे गुण शिकण्यासारखे आहेत आणि म्हणुनच त्याच सह्याद्रीत प्रत्येक पावलागणीक त्या युद्धाच्या पुर्वतयारीचे व युद्धाचे वर्णन किरण दादांच्या मुखातुन ऐकताना अंगावर अक्षरक्ष: रोमांच उभे राहत होते !!

प्रत्येकाने या संपूर्ण परिसरात एकदा फिरून ती लढाई अनुभवावी !! तो क्षण अनुभवायला हवा ज्या क्षणाला महाराज स्वत: धनुष्यबाण घेवुन लढाईत उतरले होते. तो क्षण अनुभवायला हवा ज्या क्षणाला कारतलाब खान आणि रायबागन यांनी शिवरायांसमोर शरणागती पत्करली.. या शरणार्थींना मुत्सदीपणे माफ करून फारशी मनुष्यहानी न करता खुप सारे धन मिळविले.

मी प्रथमच उंबरखिंडीत येतोय अशातला भाग नव्हता पण, आज किरण दादांच्या मुखातुन तो इतिहास ऐकत ऐकत ह्या सह्याद्रीत भटकण्याचे भाग्य मला लाभले !! धन्यवाद किरण दादा.



## अफवांची पुंगी........ किल्ले मांगी तुंगी




या दिवाळीची स्पेशल नाशिक मोहिम पार पाडयची होती.मुंबईतुन निघालो नाशिकला सोलार लँप च वाटप केल. आता उरलेल्या वेळेत काय करायच हा गहण प्रश्न निर्माण झाला. वेळ फार कमी होता आणि अंतर्गत सुत्रांच्या माहीतीनुसार गड सर करण्यासाठी लागणारा वेळ जास्त होता. कमी वेळात संपुर्णपणे पाहता येईल अस ठिकाण ठरत नव्हतं. एक मारुतीरायाची मुर्ती पाहायचं ठरलं पण काही "अंतर्गत" आणि "बाह्य सुत्रांनी" सांगितल ते ठिकाण ५ ते ७ कि.मी. चालुन जावे लागेल, त्यामुळे "प्लान A" जवळपास फिस्कटला होता. मग ठरल मांगी तुंगी ला जायच पण त्याला जायला तब्बल ४ तास लागतात असं खात्रीलायक सुत्रांनी सांगीतल्याने किंचीतसा ठरलेला "प्लान B" पण फिस्कटत चालला होता. त्यामुळे मांगी तुंगीच्या बाजुच्या डोंगरावरील जैन मुर्ती पाहुन परतीच्या प्रवासाला निघायच असा "प्लान C" ठरला. पण दुर्गवीरचे "इंजिनीयर्स चॉईस" प्रशांत बंधुंनी प्रवाहाच्या विरोधात जावून खात्रीलायक सुत्रांना डावलुन एक भयानक प्लान रचला तो म्हणजे फिस्कटलेला "प्लान B" सत्यात उतरावयचा. त्याला अजित दादा, नितीन दादा यांनी खतपाणी घातले. मग मी पण अफवा, अंधश्रद्धा झुगारून त्यांच्या कटात सामील झालो. सुरूवातीला प्रशांत बंधु आणि अजित दादांनी ५:०५ मिनिटांनी गड चढायला सुरुवात केली. मी आणि नितीन बंधुंनी ५:१० मिनीटांनी त्यांच्या पावलांवर पाउल ठेवले. आमच्या मागुन अमित शिंदे नावाचा "चित्ता" येतच होता. मग मजल दरमजल करत मी अजित दादा, प्रशांत बधु, प्रफुल्ल बंधु, अमित बंधु आणि नाशिकचे एक शिलेदार (राव तुमच नाव आठवत नाही.समजुन घ्या)आम्ही एव्हाना फ्रंट फुट वर बॅटिंग करत निघालो होतो. गडाच्या मध्यावर विवेक पाटिल दादा आणि स्नेहा काटकर ताईंची भेट झाली. जिकडे मांगी -तुंगी ही मॅच पुर्ण करायला ४ तास लागणार हे "खात्रिलायक सुत्रांनी" सांगितल त्याचा पहिला "पॉवर प्ले" आम्ही अवघ्या ५० मिनीटात पुर्ण केला. आम्ही सर्व ५० व्या मिनिटाला तुंगीला पोहोचलो. फक्त अमित नावाचा चित्ता सोडुन हा आमच्या ५ ते १० मिनिट अगोदरच पोहोचला होता. पहिला "पॉवर प्ले" जोरात खेळल्यामुळे थोडस आरामातच १५ मिनिटातच तुंगी उतरुन मांगीच्या चढाईला सुरूवात केली. आणि दोन्ही गड मिळून अवघ्या "दोन तास चोवीस मिनिटात" मोहिम संपवीली. मागुन आलेल्या शिलेदारांनी फक्त तुंगी पुर्ण केला काहींनी तर पुंगी पण वाजवीली अस ऐकलं.

गडावर गड अस्तित्वात नव्हताच, त्याच एक जैन तिथक्षेत्र झाल्याच प्रकर्शाने जाणवलं. सगळीकडे लोखंडी जाळ्यात "बांधुन" ठेवलेल्या मुर्त्या नजरेत येत होत्या. त्यात अजुन एक भर म्हणून बाजुचा डोंगर पोखरून त्यात अजुन एक मुर्ती कोरली जात होती. असो तो धार्मिक वाद नको. पण या मोहिमेतुन एक मात्र शिकलो अफवांवर विश्वास ठेवु नये......



# रानभुलीची राणी

”



कधी कधी महान असलेलं व्यक्तीमत्व अगदि साधेपणाने तुमच्या समोर येत आणि आपल्यातला बडेजावपणा, अहंकार नष्ट होवून त्या व्यक्तींच्या चरणांवर डोक ठेवावंस वाटतं. छायचित्रात दिसणारया आज्जी या कोणी सामान्य व्यक्तीमत्व नाहीय. या आहेत “मनु आज्जी” म्हणजे गो. नि. दांडेकर यांना रायगड दाखविणारी याच त्या “राणभुली च्या नायीका” या आज्जींवर गो. नि. दांडेकरांनी “रानभुली” सारखी कादंबरी लिहीली.

दि. २० नोव्हेंबर २०१६ या दिवशी दुर्गवीर रामजी कदम यांनी या मनु आज्जींच घर दाखवलं. आम्ही त्यांच्या घरी गेलो, पण काही कामानिमीत्त त्या बाहेर गेल्या होत्या. त्यांच्या घरच्यांशी बोलतोय इतक्यात मनु आज्जी तिथे आल्या. झपझप पडणारी पावलं आणि अंधारातही चमकणारे तेजस्वी डोळे अस हे व्यक्तीमत्व समोर आलं आणि क्षणभराचा विलंब न करता आम्ही एक एक करुन आज्जींच्या पाया पडलो. अक्षरश: मन शहारून आल. एखाद्या हिरो-हिरॉईन ला पाहिल्यावर काहीच वाटणार नाही पण त्या क्षणाला आज्जींना पाहिलं आणि नकळतच पायावर डोक ठेवायची इच्छा झाली. जी पावलं अगदि १० वर्षाची असताना गो. नि. दांडेकर, बाबासाहेब पुरंदरे यांच्यासोबत रायगड फिरली त्या पावलांच्या सुरकुत्यांवर डोक ठेवायाचं भाग्य आम्हाला लाभलं. खरंच एक क्षण मन भरुन आलं जेव्हा आज्जींच्या पाया पडलो. त्यांनी कौतुकाने डोक्यावरुन हात फिरवला तेव्हा त्या स्पर्शात आजीची माया जाणवली. रामजी कदम आज्जींबद्दल आम्हा सर्वांना सांगत होते त्यावेळी आज्जींच्या डोळ्यात त्या जुन्या आठवणी स्पष्टपणे दिसत होत्या. आज्जी जमीनीकडे एकटक बघत होत्या आणि पायाच्या अंगठ्याने जमीन उकरत जुन्या आठवणींना उजाळा देत होत्या.

सध्या वयोमानानुसार तब्येतीची कुरबुर असली तरी रामजी कदम म्हणाले तसे आज्जींच्या डोळ्यांमध्ये एक “तेज” होते. हे तेज त्या तिन्ही सांजेच्या अंधारात लख्खपणे दिसत होते. वेळेच्या कमतरतेने आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो, तर आज्जी चहाचा आग्रह करु लागल्या पण पाणी पिवुनच आम्ही आज्जींचा निरोप घेवून आम्ही निघालो. भल्या भल्या विभुतींना गडावर पोहोचायला मदत करणारया मनु आज्जी आम्ही निघतोय म्हटल्यावर अगदि नातवंड परत चाललीत या प्रेमाने गाडीपर्यंत सोडायला आल्या तेव्हा त्या “निस्वार्थी राणी” कडे पाहतच राहावसं वाटलं. अगदि गाडी नजरेआड होईपर्यंत आज्जी आम्हाला पाहत राहील्या......पण



## भगावान की घर मे देर है, अंधेर नही....




बरयाच महिण्यानंतर  माझी मानगड श्रमदान मोहिम होती. कित्येक वर्षापासुन फेसबुक वरून भेट होत असलेल्या "मकरंद केतकर" आणि "ओंकार ओक" यांच्या भेटीमुळे भगवान के घर मे देर है अंधेर नही.... अशी वाली फिलिंग आली होती.

फेसबुक वरुन सातत्याने सर्प, निसर्ग या विषयांवर ज्यांचे लेख वाचत आलो त्या मकरंद दादा आणि दुर्गस्थापत्य या विषयाचे अभ्यासक ओंकार दादा यांची भेट झाली. मानगड उतरताना अवघ्या १५-२० मिनिटामध्ये निसर्ग, झाड, फुल यावर खोलवर आणि आम्हा पामरांना समजेल, झेपेल अश्या भाषेत (काही इंग्लिश शब्द वगळता) बोलणारया मकरंद दादांच बोलण ऐकतच रहावस वाटत होत. अगदि डोंगरांचा हा आकार असा का ??? दगडांना गोलाकार नक्षी कशी येते ??यावर थोडक्यात दादांनी समजावीले. मुंग्यांच अगदि सामान्य वाटणारे वारूळ याची एका दिशेची भिंत जाड व एका दिशेची भिंत पातळ अशी का असते ?? या मागच विज्ञान ऐकुन तर निसर्ग आपल्यापेक्षा स्थापत्यकलेत किती प्रगत आहे हे जाणवते. १०-१२ कि. मी. परिसरात पसरलेली वेल कोणतीही मोटार पंप न वापरता, कोणताही आवाज न करता एका पेशीतुन दुसरया पेशीत पाण्याचा थेंब पसरवत स्वत:ला जिवंत ठेवते. यासारखी उदाहरणे देवुन मकरंद दादांनी श्रमदानातुन आलेला थकवा विसरायला भाग पाडले. मकरंद दादांच्या निसर्ग, साप या विषयांवरील अभ्यासवर्गाला एकदा उपस्थित राहायचय बघुया कधी योग येतोय. ओंकार दादांकडून फारसं ऐकायला मिळाल नाही पण निरोपाच्या भााषणात दादा बोलले की, मी एक नवखा ट्रेकर आहे. फार नाही २५० किल्ले फिरलोय. या वाक्यावर दादांना सांगावस वाटल दादा तुम्ही जेवढे किल्ले फिरलात तेवढि नाव सुद्धा आम्हाला माहित नसतील. संघटनेची ताकद खुप असते. सर्वानी एकत्र येवुन काम करणं हीच संघटनेची ताकद असते. या सर्वांना एकत्र ठेवायचे काम संतोष दादांनी केलय म्हणुनच आज दुर्गवीरचे हात आभाळाला टेकलेत आणि पाय जमिनीवर आहेत. दादांच हे वाक्य ऐकुन बरं वाटल की एक दुर्गवीर म्हणून आपला कुणीतरी आदर करतयं आणि सोबत आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीवही होते. ओंकार दादांचा दुर्गस्थापत्य या विषयावरील ज्ञान कधी ऐकायला मिळतय कुणास ठावुक.

या दोन व्यक्तींबद्दल इतक भरभरून लिहीण्याचे कारण म्हणजे आदल्याच दिवशी हे दोघे शालेय मुलांना या विषयावर माहीती देवुन आले होते. सातत्याने यांचे असे माहीतीपुर्ण कार्यक्रम प्रत्येक शाळेततुन राबवायला हवेत. तरच पुढची पिढी योग्य दिशेने घडेल, अन्यथा पोकेमॉन, डोरेमॉन मध्ये अडकलेल्या या आजच्या पिढिला गड किल्ले आणि निसर्ग याची महती कधीच कळणार नाही. दादांनो तुमच्यासोबतच्या अभ्यास दौरयाची वाट पाहतोय.

टीप :- मकरंद दादांचा प्रश्न होता "मी बोलत का नाही"....त्याच कारण अस होत की, समोरचा जेव्हा "प्ले मोड" मध्ये असतो तेव्हा मी "रेकॉर्डींग मोड" मध्ये असतो. आणि म्हणुनच मी ''माझे अंतरंग" मध्ये "Write"मोड मध्ये असतो. बाकी चेहरयावरील एक्सप्रेशन बाबत बोलाल तर तो Manufacturing Default असावा बहुतेक...



कावनईचा असामान्य शिलेदार....



बऱयाच दिवसांपासुन ठरलेलं नाशिकच्या किल्ल्यांचा पट्टा पिंजुन काढायचा थोडक्यात नाशिक च्या किल्ल्यांची रेंज करायची. त्यानुसार एक किल्ला ठरला कावनई. कसारा हाय वे वर उभ राहुन कोणती गाडी पकडायची हा विचार करत होतो इतक्यात एक टेंपो समोरुन जाताना दिसला. सहजच हात दाखवला तर थांबलासुद्धा..... मग काय सुरू झाला प्रवास १०-१५ रुपयात इच्छित स्थळी पोहोचायचा. या प्रवासा दरम्यान आम्हाला एक मुलगा भेटला. नाव :- नागेश आसाराम पगारे, जिल्हा:- नाशिक, तालुका :- इगतपुरी, गाव :- माणिकखांब, वय साधारण १५ ते १६ कानात "बाली" सारख काहीतरी लटकवलेलं, केसांना सोनेरी कलर....... प्रथम दर्शनी तो आम्हाला वाह्यात मुलगा वाटला. आम्ही मस्करीतच त्याला विचारले काय रे येतो का गडावर... तो लगेच तयारही झाला. स्थानिक असल्याने गडांच्या वाटांची बरीचशी माहीती असल्याने आम्हीही त्याला सोबत घेतले. प्रवासादरम्यान त्याने जे सांगितले ते ऐकुन आम्ही चकितच झालो.

नागेश १ वर्षाचा असताना त्याचे आई वडील वारले. इतर नातेवाईकांनी त्याची जबाबदारी झिडकारली. त्यामुळे त्याचे पालनपोषण कोण करणार हा प्रश्न उभा राहिला. पण त्याच्या आजोबांनी त्याची जबाबदारी स्विकारली. परिस्थिती नसल्याने १० वी अगोदर शाळा सोडावी लागली. बोलत बोलत नागेश च्या सोबतीने गड अगदि रोजची पायवाट असल्याप्रमाणे चढलो. वाट चुकण्याचा प्रश्नच नव्हता कारण नागेश नावाचा "गुगल मॅप" आमच्या सोबत होता. गडाचा वाचलेला इतिहास आणि स्थानिकांच्या आख्यायीका यांचा मेळ लावत गड दर्शन करत होतो. गडावर मध्येच कुठेतरी छावणी मांडुन आणलेल खायच सामान पोटात ढकललं. गडांवरील गुहा, बुरूज, पाण्याचे टाके असा बराचसा ऐतिहासिक भाग साधारण तासाभरात पाहुन मग परतीचा प्रवास सुरु केला.

या गडदर्शना दरम्यान नागेशशी बऱयाच विषयांवर चर्चा केली. त्याच्या घरची परिस्थिती, शिक्षण, उदरनिर्वाहाचे साधन या आणि अनेक विषयांना हात घातला. गडावरुन परतीच्या वाटेला लागलो तेव्हा नागेशच्या घरी जायच ठरलं. सर्वजण नागेशच्या घरी गेलो. घर कसलं आसरयासाठी चार भिंतींच कुंपणच म्हणावे लागेल. मातीपासुन बनलेल्या चार भिंती आणि ठिगळ पडलेले छप्पर यात समाधान मानुन राहणारा श्रीमंत नागेश आम्ही पाहिला. जस घरात गेलो तसा आम्हाला अजुन एक धक्का बसला. नाबेश चे आजोबा अंध होते. या अंध आजोबांसाठी नागेश सकाळी उठुन जेवण करायचा मग मणुका घेवुन नाशिक ते कल्याण दरम्यान त्या विकायचा. पुन्हा संध्याकाळी (रात्री) आल्यावर जेवण करायचं आजोबांना द्यायच आणि दुसरया दिवशी लवकर उठायच्या संकल्पाने पुन्हा झोपायचं. त्याचा हा दिनक्रम पाहुन १० ते ६ मध्ये काम करुन लोकलच्या गर्दिच्या टिमक्या मिरवणारे आम्ही एक क्षण नागेश समोर ओशाळुन गेलो. नागेश नावाच्या श्रीमंत मुलगा आम्हाला खायला फरसान देत होता. चहा देवु शकत नव्हता कारण दुध नव्हते कदाचित ते परवाडणारेही नव्हते. म्हणून आम्ही जावुदे रे नको चहा.... उशिर होईल म्हणून चहा विषय टाळला. पण नागेश च्या चेहरयावर एक अनोख समाधान होत. की त्याच्या घरी कोणीतरी पाहुणे म्हणून आलंय. आम्ही त्याची ना जात विचारली ना धर्म. दिसला तो फक्त प्रतिकुल परिस्थितीशी लढणारा एक "असामान्य शिलेदार". थोडा वेळ थांबल्यावर आम्हाला निघायचं होत, पण मन निघत नव्हतं. ह्या शिलेदारासाठी काहीतरी करायचा विचार होता. आम्ही ७-८ जणांनी परतीच्या प्रवासाला पुरतील एवढे पैसे बाकी ठेवुन पाकीटातले होते नव्हते तेवढे पैसे जमा केले आणि नागेशकडे दिले. नागेश ते पैसे घ्यायला नकारच देत होता, कारण तो एक "योद्धा" होता. या योद्ध्याला त्याची "कीव" केलेली मान्य नव्हती. पण आमची मदत त्याची "किव" वाटली म्हणून नव्हती तर "अभिमान" वाटला म्हणून होती.

पुन्हा लवकरच आपली भेट होईल हे आश्वासन देवुन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. आम्हा सर्वांचे फोन नंबर देवून आम्ही निघालो. त्याच्याकडे फोन नव्हता म्हणून त्याचा नंबर घेवु शकलो नाही. परत निघताना मनात एक विचार घेवुन निघालो.... आपण ट्रेन मध्ये जागा मिळत नाही म्हणून स्वत:च्या नशिबाला दोष देत असतो पण नागेश नावाचाा योद्धा प्रतिकुल परिस्थितीशी लढुन स्वत:ची जागा बनवतोय..... खरच आमची भेट एका असामान्य शिलेदाराशी झाली.... नागेश....कावनईचा असामान्य शिलेदार......



# वाघीणी त्या रणरागीणी......



"मी या दोघींना काहीही करण्यापासुन थांबवत नाही, त्यांना त्यांच्या इच्छेनुसार जे हव ते सर्व करायची परवानगी देते". हे उद्गार त्या मातेचे आहेत ज्या मातेने ह्या दोन वाघीनी घडविल्या आहेत. या दोघी बहीणी आकांशा (इयत्ता-१०वी) आणि वैष्णवी (इयत्ता-९वी) नेमक काय काय करु शकतात? याची यादीच करावी लागेल. इतर मुलींप्रमाणे शाळा तर शिकतातच, शिवाय कराटे ही शिकतात. बर लाठी - काठी ही शिकतायत आणि नुसतं शिकत नाहीत तर इतर मुलींनाही शिकवीतात. अजुन काय तर साप सुद्धा पकडतात त्याबद्दलची संपुर्ण माहीती आणि प्रशिक्षण याबाबत जाणुन आहेत. इतकच नाही तर कबड्डी, हॉलीबॉल सारख्या खेळातही अव्वल. आणि महत्वाचे म्हणजे अत्यंत कमी वयात गडसंवर्धनासारखे कार्य करतात तेही प्रत्यक्ष गडावर जावुन. ज्या वयातल्या मुला मुलींना "गडसंवर्धन म्हणजे काय?" हेच समजावून सांगाव लागत त्या वयात या मुली दर रविवारी सामानगडावर येतात. श्रमदान मोहिम असते तेव्हा गडिंग्लजवरुन बस पकडुन १-२ तासांचा प्रवास करुन सकाळी ८ वाजता गडावर पोहोचतात आणि श्रमदान करुन दुपारच्या गाडीने परत जातात. जिथे सुट्टिच्या दिवशी आपल्याला जबरदस्तीने जाग कराव लागतं तिथे या मुली स्वत: पहाटे लवकर उठतात आणि सर्व तयारी करुन आईला सांगतात "चल आई आमची तयारी झाली आम्ही निघतो". मध्यमवर्गीय कुटुंबातील या दोघी वडील शेती करतात आणि आई नर्स आहे. काही वेळा आई कामानिमीत्त घरी नसेल तर सुगरणीची भुमिकाही पार पाडतात.

५ वर्षापुर्वी दुर्गवीर ने सामानगडाला भेट दिली. तेव्हा गडावर नियमीपणे काम करायची गरज आहे हे जाणवलं. पण करणार कोण ?? मुंबई, पुणे येथुन दर रवीवारी येवुन काम करणं कठीन होत.मग अध्यक्ष संतोष हसुरकर यांनी स्थानिक मुलांना एकत्र करण्यास सुरुवात केली. अनेक बैठका, सामाजिक उपक्रम, जनजागृतीपर उपक्रम राबविले यांच्या माध्यमातुन एक एक करून अनेक शिलेदार एकत्र केले. प्रत्येकाचे नाव इथे नमुद करू शकत नाही परंतु आजच्या घडीला किमान १५-२०जण दर रवीवारी व सुट्टिच्या दिवशी एकत्र येवून श्रमदान करतात. त्या सर्व शिलेदारांना माझा मानाचा मुजरा....

या शिलेदारांसोबत श्रमदान मोहिमांमध्ये हिरहिरीने भाग घेणारया रणरागीणी आकांशा आणि ..... आज खरया अर्थाने आदर्श ठरु शकतात. जी समज यायला आणि मार्ग सापडायला आम्हाला वयाची पंचवीशी गाठावी लागली ती समज या मुलींना १४-१५ व्या वर्षीच आली आणि योग्य मार्गही सापडला. आज खरच गरज आहे मुलांना शालेय वयातच इतिहास आणि गडकिल्ले याबाबत माहीती करून द्यायची. आजची पिढी तशी आपल्यापेक्षा हुषारच असते तो निसर्गाचा नियमच आहे. त्यांना हव ते त्यांच्याकडी उपलब्ध साधनांतुन स्वत:च शिकतात म्हणून आज पालकांची, शिक्षकांची जबाबदारी आहे की, आपण त्यांना इतिहासाच्या बाबतीतील गोष्टी उपलब्ध करून द्यायची. जर या मुलांन बालवयातच मातीच्या गोळ्याप्रमाणे आकार द्यायला सुरुवात केली तर भविष्यात त्याचा "कलश" नवकीच घडेल जो "ज्ञानामृताने" भरलेला असेल.



# चक्रव्युहातला अभिमन्यु....



पैसा नाही म्हणून शिक्षण नाही आणि शिक्षण नाही म्हणून पैसा नाही. या दुष्टचक्रात अडकलेले लोक पाहीले की, आठवण येते महाभारतातल्या अभिमन्युची ज्याला चक्रव्युहात कस शिरायचं माहीत होत पण त्यातुन बाहेर कस पडायचं हे माहीत नव्हतं. तसंच आयुष्याच्या चक्रव्युहात घुसणारया ह्या अभिमन्युरुपी लोकांना आपला अंत माहीत असताना, आयुष्याच्या चक्रव्युहात घुसल्यावर फक्त काही काळ मरण पुढे ढकलताना पाहुन मन सुन्न होते.

दगडातलं काम करणारयांच्या आयुष्यात शेवटी दगडच यावेत यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते ? ? अगदि हेच दगडांतील आयुष्य जगणारयांना आम्ही पाहीलय लातुर जिल्हयातील निलंगे तालुक्यातील पारधी आणि वडार समाजाच्या पाड्यात. एक उच्चभ्रू समाज जाणीवपुर्वक यांना दुर्लक्षीत करतो आणि आपण दुर्लक्षीतच करायच्या पात्रतचे आहोत असा न्युनगंड घेवून हे लोक जगतात . या अभिमन्युंना आज या आयुष्याच्या चक्रव्युहात किती काळ मरण पुढे ढकलता येईल यासाठी सहकार्य करण्यापेक्षा हे चक्रव्युह तोडुन नव्या उमेदिने आयुष्य जगण्याची कला शिकविण्याची गरज आहे.

या लोकांना सहानभुती म्हणून मदत करून यांना उपकाराच्या ओझ्याखाली ठेवण्यापेक्षा त्यांनी स्वावलंबी होण्याच्या दृष्टिने साथ द्यायला हवी. आज या भागातील मुलांना शिक्षण देण्याची गरज आहे. या मुलांना केलेली शैक्षणिक मदत त्यांच भविष्य सुधारायला मदत करेल. महिला बचतगट सारखे अनेक उपक्रम इथे राबवीले जातात परंतु यांना शिवणकामसाठी लागणारया मशीनची कमतरता असते ती पुर्ण करुन त्यांना स्वावलंबी करण्यात सहकार्य करायला हवे. आज यांनी विणकामातुन तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ व ग्राहक मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. हे सर्व शक्य होईल लोकसहभाग व सहकार्यातुन.

या लेखाच्या माध्यमातुन आपणांस आवाहन करतो की, दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे या भागातील २०० शालेय मुलांना शालेय गणवेश, गृहीणींना शिलाई मशीन आणि त्यांनी तयार केलेल्या वस्तुंना शहरातील ग्राहक व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. तुम्ही किमान एक गणवेश किंवा शिलाई मशीनसाठी सहकार्य करु शकल्यास एक कुटुंब स्वावलंबी होण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे पाऊल पडू शकेल. आपण सर्वच इंटरनेटच्या माध्यमातुन यांनी तयार केलेल्या वस्तुंना ग्राहक निर्माण करुन देवू शकतो.

चला तर या चक्रातील अभिमन्यला चक्रव्युह तोडायला मदत करूया.....

संपर्क :-

९८३३४५८१५१ / ८०९७५१९७०० / ८६५५८२३७४८

वेबसाईट :- www.durgveer.com

ई-मेल :- durgveer.com@gmail.com

दुर्गवीर बँक तपशिल :-

Bank Account Name :- Durgveer Pratishthan
Bank Name :- Bank Of Baroda
Account No. :- 04060100032343
IFSC Code:- BARB0CHNADA (Fifth Character is "ZERO")
Account Type:- Saving
Branch Name:- Chandavakar Road, Matunga, Mumbai





# खरी श्रीमंती......



प्रसंग क्र. १:-

स्थळ :- मु.पो. वडाखेल, ता. बागलान, जिल्हा:- नाशिक वेळ :- दुर्गवीर तर्फे कपडे वाटप Joy Of Happiness तर्फे वॉटर फिल्टर वाटप करताना प्रशांत वाघरे बंधुंनी येताना काही बिस्किट पुडे व चॉकलेट आणले. त्याचे वाटप करताना एका क्षणाला आईच्या कडेवर असलेल्या छोट्या मुलाने बिस्किट मिळविण्याचा हट्ट केला, पण त्याच्याकडे पोहोचेस्तोवर प्रशांत बंधुंकडील सर्व बिस्किट संपली आणि तो छोटा मुलगा रडु लागला. आता काय करायच सुचत नव्हतं. जवळपास दुकानही नव्हत आणि गाडीकडे परत जाणं शक्य नव्हतं. मग प्रशांत बंधुंनी या छायचित्रातल्या मुलाला विनंती केली की त्याने त्याच्याकडचा बिस्किडपुडा त्या लहान मुलाला द्यावा. या मुलाने फारसा विचार न करता स्वत:चा बिस्किट पुडा त्या लहान मुलाला दिला तेव्हा ते मुल रडायचं थांबल.

प्रसंग क्र.२:-

स्थळ :- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अन्काईबारी, तालुका :- येवला, जिल्हा:- नाशिक

माझे नाव.... आदिती शरद शिंदे.... माझ्या शाळेचे नाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अन्काईबारी..... मी इयत्ता ४थी मध्ये शिकते.

हे असे चुणचुणीत बोल बोलणारी ही मुलगी. बोलण्यात प्रचंड आत्मविश्वास. वागण्यात हरिणीची चपळता. आणि चेहरयावर निरागस हास्य. अश्या या चुणचुणीत रणरागीनीची ओळख झाली दुर्गवीर च्या नाशिक येथील शालेय वस्तु वाटपच्या कार्यक्रमात. अगदि तळागाळातल्या सामान्य गावात राहणारया या मुलीचा आत्मविश्वास पाहता, मला नाही वाटत की खेड्यातल्या मुलीला उंच भरारी घ्यायला कोणी रोखु शकेल. कदाचित अडथळा असेल तो परिस्थितीचा.... घरची हलाखीची परिस्थिती या मुलीला अभ्यासात आणि आयुष्यात भरारी घेण्यापासुन रोखु शकेल.

आई वडील पाथरवट त्यामुळे कामनिमीत्त मोलमजुरी करत गावोगावी फिरतात त्यामुळे ही मुल त्यांच्या आजी-आजाबांकडे असतात. ही मुल शाळेतुन घरी गेल्यावर हे त्यांना हे विचारल जात नाहा की, "बाळा शाळेत आज काय शिकवलं" ?? तर पुस्तकांची पिशवी (हो पिशवीच कारण दप्तर घेण्याइतकी परिस्थिती नसते) एका हाताने घरात ठेवली की, दुसरया हातात विहीरीवरुन पाणी भरुन आणायला कळशी दिली जाते. अभ्यास करण्याची आवड, बुद्धिमता आणि आात्मविश्वास या सर्वांची श्रीमंती असुन सुद्धा परिस्थिती गरीब असल्याने ही मुले मागे राहत आहेत.

दोन्ही प्रसंग अगदी छोटेसे पण आपल्या मनाच्या श्रीमंतीने आम्हाला आपलंस करुन टाकणारा तो मुलगा आणि आपल्या बौद्धिक आणि आत्मविश्वासाच्या श्रीमंतीने आम्हाला जिंकणारी ती मुलगी आम्हाला खुप काही शिकवुन गेली. नंतर चौकशी केली तर कळल की ह्या मुलाचा छोट्याश्या अपघातात एक डोळा निकामी झाला होता. सर्व सुख उपभोगत असुनही आपण आपल्याकडची चलनात नसलेली एखादी नोट दुसरयाला द्यायची म्हटल्यावर १० वेळा विचार करु पण नियतीने, परिस्थितीने सातत्याने धक्के देवुनही मनाची श्रीमंती राखुन ठेवेलेल्या आणि प्रतिकुल परिस्थितीतही स्वत:च्या बौद्धिक श्रीमंतीवर विश्वास ठेवणारया या दोन खरया श्रीमंताना माझा मानाचा मुजरा.....



# अतुट नाते शिवप्रेमींचे.....



तुम्ही जेव्हा एखादे चांगले कार्य करता तेव्हा तुमच्यासोबत येणारी माणसे ही चांगलीच असतात. त्यांचा तुमच्यासोबत येण्याचा उद्देशही स्वच्छ असतो. याचाच प्रत्यय आज दुर्गवीरच्या शस्त्र प्रदर्शन व गडसंवर्धन छायचित्र प्रदर्शनात आला. दुर्गवीरच्या कार्याने प्रभावीत होवून पंजाब बॉर्डरवरून शिर्डी आणि शिर्डी वरून मुंबई असा प्रवास करून आलेल्या सैनिक "सोमनाथ ढवळे" यांची भेट घेताना जाणीव झाली, आम्ही काय कमावलयं. फेसबुक वरून माझे दुर्गवीर चे फोटो व लिखान पाहुन यांना दुर्गवीर बद्दल आदर निर्माण झाला, आणि त्यांच्या १० दिवसांच्या सुट्टीचा पहिला दिवस दुर्गवीरांसोबत घालविण्यासाठी सोमनाथ ढवळे मुंबईत हजर झाले. मुंबईमधली काहीही माहीती नाही. दादर ला उतरल्यावर त्यांना कोणीतरी सांगितले त्यांना हवे असलेले काळाचौकीतील ठिकाण ३ ठिकाणी आहे. परंतु शिवकृपेने एका अनोळखी व्यक्तीने त्यांना टॅक्सी करुन प्रदर्शनाच्या जागी आणुन सोडले. ह्या घटनेतुन एक मात्र नक्की झाल की माझी आणि त्यांची ओळख होणं, त्या अनोळखी व्यक्तीने त्यांना मुंबईत मदत करणे आणि दुर्गवीरांची भेट होणे हे विधीलिखीतच होते. या सर्व भेटी शिवरायांनीच घडवुन आणल्या असाव्यात. आता आम्ही जन्मलो जरी वेगवेगळ्या ठिकाणी तरी गतजन्मी नक्कीच आम्ही सर्व मावळे होते.

मी सुट्टी मिळाली की, दुर्गवीरसोबत जातो त्यामुळे माझे नातेवाईक, मित्र मंडळी कदाचित दुखावत असतील कारण मी त्यांच्याकडे जात नाही, त्यांना वेळ देत नाही. परंतु दुर्गवीरच्या कार्यामुळे सोमनाथ ढवळे यांच्यासारख्या शिवप्रेमींशी जे अतुट नाते निर्माण होत आहे आणि समाजात आम्हा दुर्गवीरांबद्दल, आमच्या कार्याबद्दल जो आदर आहे तो पाहुन त्यांचा राग थोडा तरी कमी होत असेल.

दुर्गवीर च्या कार्यातुन मला लिखाणाची प्रेरणा मिळत गेली. मी ब्लॉग आणि फेसबुक पेजच्या माध्यमातुन लिखान करायला लागलो. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर आणि अगदि देशाबाहेरही वाचक निर्माण झाले. हे वाचक जेव्हा प्रतिक्रीया देतात तेव्हा प्रत्येक वेळी मला पुरस्कार मिळत असतो आणि हा पुरस्कार मला लिखाणासाठी आणि दुर्गवीरच्या कार्यासाठी प्रेरणा देत असतो.

ह्या प्रसंगातुन आनंद तर मिळतोच पण सोबतच जाणीवही होते एका जबाबदारीची. या कार्यातुन ज्या ओळखी झाल्या त्या जपणे आणि हे दुर्गसंवर्धनाचे, समाजसेवेचे व्रत पुढे चालु ठेवणे हे प्रत्येक दुर्गवीराचे कर्तव्य आहे.



इंटरनेटशी संबंध असणारया मराठी माणसाला ई साहित्यबद्दल माहीती होतेच. इंटरनेटच्या युगाात नेटचा वापर करुन मराठी साहित्य आणि मराठी बाणा यांचे संवर्धन करण्यासाठी काम करणारया व्यक्ती किंवा समुहासोबत ई साहित्य प्रतिष्ठान एकत्र काम करून निरनिराळी ई पुस्तके आणि ई नियतकालीके बनवीत असते आणि जवळपास दिड लाख लोकांपर्यंत ई मेल द्वारे त्याचे वितरण करते. पुढे ही शृंखला वाढत जाते आणि वर्षानुवर्षे ही पुस्तके वाचकांच्या पसंतीनुसार फिरत राहतात. वाचक वाचनाचा आनंद घेत राहतात तर लेखक त्याच्या विचारांचा प्रसार झाल्याचा आनंद घेत राहतात. ई सहित्याच्या माध्यमातुन तुम्हाला विविध विषयांवर पुस्तके मिळतील. ही सर्व पुस्तके वाचण्यासाठी तुम्हाला ना कुठे नोंदणी करायची ना काही वार्षीक, मासिक शुल्क भरायचेय. तुम्हाला फक्त **http://www.esahity.com/** या वेबसाईट वर जायच आणि तुम्हाला हव्या त्या विषयावरच पुस्तक डाउनलोड करुन घ्यायचय. बरं या पेक्षा सोपा मार्ग सांगु का ?? **esahity@gmail.com** ला कळवुन तुम्हाला हव असलेल पुस्तक मिळवु शकता. तुम्ही किमान १० किंवा जास्त ई मेल आयडी ई साहित्य ला पाठवा तुम्ही ई साहित्य चे VIP मेंबर व्हाल. मग तुम्हाला प्रत्येक पुस्तक ई मेलने मिळेल. तुम्हाला हव असलेलं पुस्तक तुम्ही वाचुन पुढे पाठवु शकता. ई मेल हा पण मार्ग सोयीचा वाटत नाहीय.... बर मग अजुन एक मार्ग सुचवतो. तुमच्या मोबाईल मध्ये ७७१०९८०८४१ हा नंबर सेव करा... केलात ?? आता या नंबर वर व्हाटस् ॲप वरुन तुमच नाव व गाव कळवा तुम्हाला नियमीतपणे यावर पुस्तके मिळत राहतील. बर यापेक्षा अजुन एक सोप्पा मार्ग आहे. ई-साहित्य प्रतिष्ठान चे ॲंड्रॉइड ॲप तुमच्या मोबाईल मध्ये या लिंक वरून डाऊनलोड करा आणि नियमीतपणे पुस्तके वाचा.

**https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks**

चला तर मराठी भाषेच्या, मराठी साहित्याच्या प्रसार आणि प्रचाराच्या या मोहिमेत तुमचाही सहभाग नोंदवा. नवनवीन लेखकांना प्रोत्साहन देवून साहित्यीकांची पुढची पिढी घडवुया.

धन्यवाद !!

आमचा पत्ता :-

**esahity@gmail.com/**
**http://www.esahity.com/**

**आपले नम्र,**
**टिम ई साहित्य प्रतिष्ठान**

